


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ३५ * नांदेड * शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## कॉँग्रेस, मोदी की कब्र खोदने के सपने देखती हैं; राज्यसभेतून मोदींचा घणाघात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधान नरेंद्र मोदींचं भाषण गुरूवारी संसदेत सुरु आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारत-चीन सीमारेषेवरील डोकलामचा विषय घेऊन सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारला. त्यावरुन, लोकसभा सभागृहात चांगलीच खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यामुळे, लोकसभेत कामकाज स्थगित करण्यात आलं असून दोन दिवसांपूर्वीच काही खासदारांचे निलंबनही करण्यात आलं आहे. आता, राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींचं भाषण सुरू असून मोदींनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. तर, मोदींचे भाषण सुरू होताच विरोधकांकडून जोरदार हल्लाबोल करण्यात आला.

मोदींचे भाषण सुरू होताच राज्यसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी तानाशाही नही चलेगी अशी घोषणाबाजी केली. त्यावर, मोदींनी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना टोला लगावला. आदरणीय खर्गेंची तुमचं वय लक्षात घेता तुम्ही खाली बसूनच नारेबाजी करावी, इथे तरुण खासदारही आहेत, असे म्हणत खर्गेंना टोमणा लगावला. त्यानंतर,



विरोधकांनी राज्यसभेतूनही वॉकआऊट केल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर, मोदींनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली.

'मोहब्बत की दुकान खोलने वाले, मोदी तेरी कब्र खुदेगी के नारे लगा रहे हैं. ये कौन सी मोहब्बत की दुकान है, जो देश के ही किसी नागरिक के कब्र खोदने के सपने देख रही है. ये कौन से संविधान से उन्होंने सीखा है. क्या ये मानवता का अपमान नहीं है, लेकिन उन्हें इसका कोई खेद नहीं है. इसके बाद बयान देगा कि राज्यसभा में पीएम मोदी रो रहा था. किस प्रकार के संस्कारों से पले-बढ़े लोग हैं ये लोग. काँग्रेस मोदी की कब्र खोदने के सपने देखती है, असेही मोदींनी म्हटले.

आपला देश आज वेगाने पुढे जात असून आपण थांबायचं नाही, मागे वळून पाहायचं नाही. जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा जगातील ६ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होता. मात्र, काँग्रेसने देशाची अर्थव्यवस्था १० व्या क्रमांकावर नेऊन ठेवली होती, असे म्हणत मोदींनी राज्यसभेतून पुन्हा काँग्रेसच्या युपीए सरकारवर निशाणा साधला.

### पीएम मोदी संसदेत आले असते, तर अनुचित प्रकार घडला असता

सभागृहात काय घडलं, हे संपूर्ण देशाने पाहिले. ही घटना संसदेच्या इतिहासावर लागलेला एका काळा डाग आहे. काही खासदारांनी थेट पंतप्रधानांच्या खुर्चीकडे जाण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधानांच्या बाबतीत काहीही अनपेक्षित घडू शकले नाहीत. याच कारणामुळे आपण पंतप्रधान मोदींना सभागृहात न येण्याची विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली, असे ओम बिर्ला यांनी स्पष्ट केले.

## मेघालयातील कोळसा खाणीत स्फोट, १६ जणांचा मृत्यू

**शिलाँग (वृत्तसंस्था)–** मेघालयातील पूर्व जयंतिया हिल्स जिल्ह्यात गुरुवारी एक मोठी दुर्घटना घडली आहे. या ठिकाणी असलेल्या एका बेकायदेशीर कोळसा खाणीत भीषण स्फोट झाला आहे, या स्फोटात १६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक लोक जखमी झाले आहेत. डायनामाइट फुटल्याने ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

या कोळसा खाणीत १६ मजुरांचा मृत्यू झाला. या ठिकाणी अनेक लोक अडकल्याची भीती आहे. पोलिसांनी आणि राज्य मदत पुनर्वसन पथकाकडे मदत मागितली आहे. पोलीस अधीक्षक विकास कुमार यांनी सांगितलं की ही घटना थांगस्कू भागात झाली आहे. आत्तापर्यंत सात जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. एका व्यक्ती ७० टक्के भाजला आहे, त्याला आम्ही उपचारांसाठी शिलाँगला पाठवलं आहे. बचाव पथकाचं कार्य या ठिकाणी सुरु आहे.

## महापालिकेच्या महापौर निवडीची प्रक्रिया सुरु; आज अर्ज दाखल होणार

### भाजपने घेतले आठ उमेदवारी अर्ज; काँग्रेस-वंचितने सहा तर एमआयएमने घेतले ४ उमेदवारी अर्ज

### सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी पद राखीव, भाजपच्या पहिल्या महापौर कोण?



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महापालिका महापौरपदाची निवड प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारीपासून सुरु झाली आहे. अनेक इच्छुक उमेदवारांनी अर्ज विकत घेतले आहेत. या उमेदवारांचे अर्ज शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी विशेष सभेत महापौर निवडला जाणार आहे. यावेळी सर्वसाधारण महिला प्रवगार्साठी हे पद राखीव असल्याने भाजपाचा पहिला महापौर पदाचा मान कुणाला मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजपने स्वबळावर ४५ जागांवर विजय मिळविला तर शिवसेना शिंदे गटानेही पाठिंबा देत ४ सदस्य भाजपासोबत जोडले आहेत. त्यामुळे भाजप आणि शिवसेना महायुतीची सदस्य संख्या आता ४९ वर पोहोचली. दुसरीकडे महापालिकेत तेलंगणातील एमआयएमने १४ जागा मिळवत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. काँग्रेसला १०, वंचित बहुजन आघाडीला ५, राष्ट्रवादी (अजित पवार गट) दोन आणि एका अपक्ष उमेदवारालाही संधी मिळाली आहे.

महापौर निवडण्याची प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर दि. ५ फेब्रुवारी रोजी सुरू झाली आहे. महापौर, उपमहापौर पदासाठी अनेक इच्छुकांनी अर्ज विकत घेतले आहेत. दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात दि. १० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या विशेष सर्वसाधारण सभेत महापौर पदाची निवडणूक होणार आहे. सकाळी ११ वाजता महापालिकेच्या सभागृहात ही विशेष सर्वसाधारण सभा होईल. महापौर पदासाठी हात वर करून मतदान घेण्यात येणार आहे. दरम्यान माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण बुधवारी रात्री नांदेडमध्ये दाखल झाले. यानंतर गुरूवारी नगरसेवकांची बैठक घेत महापौर निवडीबाबत नगरसेवक (पान ३ वर...)

### महापौरांचा निर्णय प्रदेश कोअर कमिटीच घेणार

पत्रकार परिषदेमध्ये नांदेडचा महापौर कोण? असा प्रश्न विचारला असता खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश कोअर कमिटी स्थापन करण्यात आली आहे. कमिटी जो निर्णय घेईल व ज्या उमेदवाराचे नाव देतील तो महापौर असेल असे त्यांनी सांगितले.

### महापौर निवडणुकीचे मतदान गुप्त पद्धतीने घ्यावे

एनसीपी आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महापौर पदाचे मतदान हे गुप्त पद्धतीने घेण्यात यावे अशा मागणीचे पत्र वंचित बहुजन आघाडीचे गटनेते प्रशांत इंगोले आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते साबेर चाऊस यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहे.

### एकूण १८ अर्जांची विक्री

भाजपचे गटनेते महेश कनकदंडे यांनी महापौर आणि आणि उपमहापौर पदासाठी प्रत्येकी आठ अर्ज विकत घेतले. काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने एकूण ६ अर्ज तर एमआयएमने ४ अर्ज विकत घेतले आहेत.

## गैरप्रकाराने ऑनलाईन १५,५६९ बनावट जन्म नोंदणी; शासनाची फसवणूक

### किरीट सोमय्याची सावळेश्वर ग्रामपंचायतला भेट, उस्माननगर ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील सावळेश्वर ग्रामपंचायत येथे ऍड इव्हेंट या टॅबचा वापर करून सीआरएस पोर्टल युजर आयडी एमएच २०३६२ आरईच्या गैरप्रकाराने १५ हजार ५६९ बनावट जन्म नोंदी करण्यात आल्या आहेत. या संदर्भाने एका अज्ञात आरोपीविरुध्द उस्माननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १ मे २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान घडला. या ग्रामपंचायतला माजी खासदार किरीट सोमय्या यांनी भेट दिली आहे.

ग्राम पंचायत सावळेश्वर ता. कंधार येथील ग्राम पंचायत अधिकारी भावना माधवराव कावळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्या सन २०२२ पासून ग्राम पंचायत अधिकारी म्हणून सावळेश्वर येथे कार्यरत आहेत. जन्म आणि मृत्यूची नोंदणी करण्यासाठी शासनाच्या सीआरएस पोर्टलची त्यांची युजर आयडी एमएच २०३६२ आरई आहे. त्याचा वापर त्या स्वतः आणि ऑपरेटर मारोती नामदेव कदम हे करतात. त्या पोर्टलला वापरतानाचा ओटीपी माझ्याच मोबाईलवर येतो. दि.२ फेब्रुवारी रोजी गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांना फोन करून सांगितले की, त्यांच्या ऑनलाईन पोर्टलवर सावळेश्वर गावात १५ हजार ५६९ जन्म नोंदी करण्यात आल्या आहेत. त्याबद्दल तुम्हाला काय माहित आहे? पण मला काही माहिती नसल्याचे त्यांना सांगितले. त्यानुसार सन जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय सावळेश्वर येथे फक्त एक जन्म नोंद आहे.

पुढे या पोर्टलवर ऍड ओल्ड इव्हेंट या टॅबचा वापर करून १ जून २०२५ ते ३० जून २०२५ मध्ये ५२ पुरुष व ६० महिलांच्या जन्माची नोंद आहे. यात तृतीयपंथियांची सुध्दा नोंद आहे. हा सर्व कारभार ३१ नोव्हेंबर २०२० पर्यंत सुरू होता. या पोर्टलवर एकूण १५ हजार ५७० बोगस नोंदी आहेत. या माझ्या ऑनलाईन आयडीचा वापर करून कोणी तरी हा प्रकार केलेला आहे.

उस्माननगर पोलिसांनी या प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३७, ३३६(३), ३४० (२) आणि भारतीय तंत्रज्ञान कायदा कलम ६५ आणि ६६ प्रमाणे अज्ञात आरोपींविरुध्द फसवणुकीचा गुन्हा क्रमांक दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार करत आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी गुरुवारी नांदेड जिल्ह्यात येऊन सदर ग्रामपंचायतला जाऊन भेट दिली व काही कागदपत्रे व दस्तावेज ताब्यात घेतले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात नोंदी झालेले प्रमाणपत्र हे नेमके कोणाला देण्यात आले आणि कोणी हा कार्यक्रम केला याची चौकशी करण्यात येणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले. सावळेश्वर येथून आल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची ही भेट घेतली.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंगळवारी स्वीकारणार पदभार

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेल्या सुनेत्रा पवार मंगळवारी, १० फेब्रुवारी रोजी औपचारिकरित्या पदभार स्वीकारणार आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर त्याच दिवशी त्या मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित राहणार असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्यालयालाही भेट देणार आहेत.



सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, तसेच अल्पसंख्याक आणि औकाफ या मंत्रालयांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. १० फेब्रुवारी रोजी सकाळी मंत्रालयात पदभार स्वीकारल्यानंतर दुपारी १२ वाजता होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीला त्या उपस्थित राहतील. अजित पवार यांच्या निधनामुळे या आठवड्यातील मंत्रिमंडळ बैठक रद्द करण्यात आली होती. दरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्याकडे असलेले पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पददेखील सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आले आहे.

## कुवैतमध्ये मुखेडच्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू

### कुटुंबियांनी चौकशीसाठी भारतीय दूतावासाकडे केली मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** कुवैत येथे वास्तव्यास असलेल्या मुखेड तालुक्यातील एका नागरिकाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, या प्रकरणी सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी मृताच्या कुटुंबियांनी भारतीय दूतावासाकडे केली आहे.



नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील बिहारपूर येथील रहिवासी शेख जुबेर महम्मदसब शेख (वय अंदाजे ३०) याचा ४ फेब्रुवारी २०२६ रोजी कुवेतमध्ये मृत्यू झाला. मृत शेख जुबेर हे भारतीय पासपोर्ट क्रमांक पी ३४२७६९९ चे धारक होते. कुटुंबियांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांचा मृत्यू नैसर्गिक नसून संशयास्पद परिस्थितीत झाल्याचे संकेत मिळत आहेत. घटनेभोवती अनेक विसंगती आढळून येत असल्याने, हा मृत्यू अपघाती नसून घातपाताचा असण्याची शक्यता कुटुंबियांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर मृताचे वडील मोहम्मदसाब शेख यांनी भारतीय दूतावास, कुवेत यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. संबंधित निवेदनात कुवैतमधील स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. (पान ३ वर...)

## दारूच्या नशेत एकाने पेटवून घेऊन केली आत्महत्या

### शिवाजीनगर भागातील घटना




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या सांगवी परिसरात राहणाऱ्या शेख सलमान या युवकाने दारूच्या नशेत शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी घडली होती.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या घमोडीया फॅक्टरी परिसरात शेख सलमान अंदाजे वय २६ वर्ष याने दारूच्या नशेत आपल्या अंगावर पेट्रोल ओतून स्वतःला पेटवून घेतले. अंगावरील कपड्यांनी पेट घेतल्याने तो सैरावैरा धावत सुटला. यावेळी उपस्थित लोकांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला मात्र तो यात गंभीर भाजला गेला. शिवाजीनगर पोलिसांनी त्याला तात्काळ विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात (पान ३ वर...)




## देशाचा अर्थसंकल्प सर्वसमावेशक, विकासाभिमुख आणि दिशा देणारा -खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेला नववा अर्थसंकल्प देशाला दिशा देणारा असून या अर्थसंकल्पातून भारताची वेगवान आर्थिक घोडदौड, सर्वसमावेशक विकासाप्रती कटीबद्धता आणि विकसित भारताचे उद्दिष्ट स्पष्ट दिसत असल्याचे मत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



केंद्र सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या 'विकसित भारत युवा नेते संवाद' या उपक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समक्ष अनेक नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्यात आल्या होत्या. या अर्थसंकल्पातील अनेक प्रस्ताव त्या कल्पनांमधून प्रेरित असून, हा अर्थसंकल्प युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे महिला, शेतकरी, उद्योजक, गरीब, वंचित आणि सर्वच समाजघटकांना पाठबळ देण्याचे भरीव प्रयत्न या अर्थसंकल्पातून झाले आहेत. केंद्र सरकारने सादर केलेला हा अर्थसंकल्पात आर्थिक वाढीला वेग देणे आणि हा वेग कायम राखणे. हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात विविध क्षेत्रांची क्षमता वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

त्यानुसार भारताला जागतिक जैव-औषधनिर्मिती केंद्र बनवण्यासाठी अर्थसंकल्पात 'बायोफार्मा शक्ती' ही योजना तयार करण्यात आली आहे. 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन-२' सुरू करण्याची घोषणा झाली आहे. इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादन योजनेसाठी तरतूद ४० हजार कोटी रुपये करण्यात आली आहे. देशांतर्गत रासायनिक उत्पादन वाढवून आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी ३ समर्पित केमिकल पार्क स्थापन करण्यासाठी राज्यांना सहाय्य करणारी योजना सुरू केली जाणार आहे.

खादी, हातमाग व हस्तकला बळकट करण्यासाठी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज' उपक्रम सुरू होणार आहे. देशातील सुमारे २०० पारंपरिक औद्योगिक क्लस्टर पुनरुज्जीवित करण्यासाठी विशेष योजना राबवली जाणार आहे. एमएसएमईला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी पावले उचलण्यात आली आहे.

पायाभूत सुविधांना व पर्यायाने रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी येत्या आर्थिक वर्षात १२.२ लाख कोटी रुपयांचा सार्वजनिक भांडवली खर्च करण्याचा निर्धार केंद्र सरकारने या अर्थसंकल्पातून व्यक्त केला आहे. भारताला जागतिक मेडिकल हब करण्याचा निर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. त्यासाठी पुढील ५ वर्षांत १ लाख संलग्न आरोग्य व्यावसायिक तयार करणे, १.५ लाख केअर गिव्हर प्रशिक्षित करणे, देशात ५ प्रादेशिक वैद्यकीय हबची निर्मिती करणे, ३ नवीन अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची निर्मिती होणार आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य सेवेला अधिक बळकट करण्यासाठी जिल्हा रुग्णालयांच्या ट्रॉमा केअर क्षमतेत ५० टक्क्यांनी वाढ केली जाईल.

देशातील १५ हजार शाळा आणि ५०० महाविद्यालयांत AVGC लॅब्स (Animation, Visual Effects, Gaming Comics) उभारून वेगाने वाढणाऱ्या जगातील या क्षेत्रांसाठी आपल्या पुढच्या पीढीला सज्ज करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे.

या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, कृषी उत्पादकता आणि क्रयशक्ती वाढवण्यासाठी सुधारणा राबवण्यात आल्या आहेत. रोजगारनिर्मिती, उत्पादकता वाढवणे आणि विकासाला गती देण्यासाठी केंद्र सरकारने व्यापक आर्थिक सुधारणा केल्या आहेत. यासह अन्य बाबींसंदर्भात यावेळी माहिती देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला खा. डॉ. अजित गोपछडे, आ. श्रीजया चव्हाण, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, चैतन्यबापू देशमुख, निलेश देशमुख बारडकर, डॉ. सचिन उमरेकर, विजय येवनकर, अमितसिंह तेहरा, विजय गंभीरे, दिलीप ठाकूर, महेश उर्फ बाळू खोमणे यांची उपस्थिती होती.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड, पण...

जागतिक अर्थव्यवस्थेवर अनिश्चिततेची गडद छाया असताना, अमेरिकेसह अनेक देशांमध्ये टैरिफ युद्धाचे वारे वाहत असताना आणि भू-राजकीय तणाव वाढलेला असताना भारताने मात्र आपली आर्थिक गती कायम राखली आहे. संसदेत सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षणाने यावर शिक्कामोर्तब केले असून, आगामी वित्त वर्ष २०२६-२७ मध्ये भारताचा विकासदर ६.८ ते ७.२ टक्क्यांच्या दरम्यान राहील, असा आशावाद वर्तवण्यात आला आहे. जागतिक पातळीवर मंदीची भीती व्यक्त होत असतानाही भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहणार असल्याचे हे संकेत केवळ दिलासादायकच नव्हे, तर आत्मविश्वास वाढवणारे आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या या सर्वेक्षणात भारताच्या आर्थिक पायाभूत ताकदीवर विशेष भर देण्यात आला आहे. मागील काही वर्षांत राबविण्यात आलेल्या संरचनात्मक सुधारणा, सार्वजनिक गुंतवणुकीवर दिलेला भर आणि वित्तीय शिस्त यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. जागतिक अस्थिरतेचे धक्के पचवण्याची क्षमता भारताने विकसित केली आहे, हे या अहवालातून स्पष्ट होते. संभाव्य जीडीपी वाढदर ७ टक्क्यांपर्यंत पोहोचणे म्हणजे भारत उच्च विकासाच्या मार्गावर स्थिरपणे पुढे जात असल्याचा ठोस पुरावा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, हा वेग केवळ आकड्यांपुरता मर्यादित नाही. आर्थिक सर्वेक्षणात वित्तीय तूट नियंत्रणात ठेवण्याच्या दिशेने सरकारची वाटचाल अधोरेखित करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात जीडीपीच्या ४.४ टक्के वित्तीय तूट साध्य करण्याच्या दिशेने केंद्र सरकार योग्य मार्गावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वित्तीय एकत्रीकरण आणि सार्वजनिक गुंतवणूक यांच्यात साधलेला समतोल हा सरकारच्या धोरणात्मक परिपक्वतेचा दाखला आहे. याच शिस्तबद्ध धोरणांमुळे भारताला चालू वर्षात तीन सार्वभौम क्रेडिट रेटिंग उन्नती मिळाल्या, हे विशेष उल्लेखनीय आहे. सार्वजनिक गुंतवणुकीतील सातत्य हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ठरत आहे. २०२० ते २०२५ या कालावधीत केंद्र सरकारच्या एकूण खर्चात भांडवली खर्चाचा वाटा १२.५ टक्क्यांवरून तब्बल २२.६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. जीडीपीच्या तुलनेत प्रभावी भांडवली खर्च २.६ टक्क्यांवरून ४ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. रस्ते, रेल्वे, बंदरे, डिजिटल पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांतील गुंतवणूक दीर्घकालीन विकासाला चालना देत आहे. ही गुंतवणूक केवळ रोजगारनिर्मिती करत नाही, तर खासगी गुंतवणुकीलाही आकर्षित करते. आर्थिक सर्वेक्षणाने बजेटपूर्वी काही महत्त्वाचे संकेतही दिले आहेत. १ एप्रिलपासून लागू होणारा नवीन आयकर कायदा कररचनेत सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न आहे. करप्रणाली सुलभ आणि पारदर्शक झाल्यास करदात्यांचा विश्वास वाढेल आणि करसंकलनातही सुधारणा होईल. शेती क्षेत्रासाठी दिलेला संदेशही तितकाच महत्त्वाचा आहे. पुढील चार वर्षांत कृषी निर्यात १०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळू शकते. याशिवाय, सामाजिक पातळीवरील काही संवेदनशील मुद्द्यांवरही सर्वेक्षणाने भाष्य केले आहे. लहान मुलांमधील डिजिटल व्यसनाधीनता रोखण्यासाठी सोशल मीडिया ॲप्सवर वयोमर्यादा घालण्याची शिफारस ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे, सकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत प्रक्रिया करण्यात आलेल्या अन्नाच्या जाहिरातींवर बंदी घालण्याचे संकेत सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकतात. आर्थिक विकासासोबत सामाजिक आरोग्य आणि मानसिक कल्याण यांचा समतोल साधणे हेही तितकेच आवश्यक आहे, याची जाणीव या शिफारशींमधून दिसून येते. तथापि, या सर्व सकारात्मक चित्रासोबत काही आव्हानेही आहेत. जागतिक व्यापारातील अनिश्चितता, कच्च्या तेलाच्या किमती, हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम आणि रोजगारनिर्मितीची गरज यांसारखे प्रश्न अजूनही कायम आहेत. वेगवान विकास टिकवून ठेवण्यासाठी धोरणात्मक सातत्य, सुधारणा आणि समावेशक वाढ यावर भर देणे अपरिहार्य ठरेल. केवळ जीडीपी वाढीपुरते न थांबता, ती वाढ सामान्य नागरिकांच्या जीवनमानात कशी प्रतिबिंबित होते, हे महत्त्वाचे आहे. यासोबतच नेहमीच सर्वात दुर्लक्षित असलेले क्षेत्र म्हणजे शिक्षण. त्या संदर्भात मात्र येणाऱ्या अर्थसंकल्पात कोणती तरतूद करण्यात येणार आहे हे सांगण्यात आलेले नाही. जर या क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले तर येणाऱ्या अनेक पिढ्या देशाच्या प्रगतीसाठी हातभार लावू शकणार नाहीत. म्हणून या क्षेत्रामध्ये अधिक गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. केवळ आर्थिक प्रगती झाली आणि युवकांचे डोके रिकामे राहिले तर त्यातून विनाश संभवू शकतो हे विसरता येणार नाही. आर्थिक सर्वेक्षणाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या 'सुपर फास्ट' घोडदौडीचे वास्तववादी पण आशादायी चित्र मांडले आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारताने आपला आत्मविश्वास, धोरणात्मक स्पष्टता आणि विकासाचा वेग टिकवून ठेवला आहे. आगामी बजेटमध्ये या दिशेने आणखी ठोस पावले उचलली गेली, तर भारत केवळ वेगाने वाढणारीच नव्हे, तर अधिक समावेशक आणि सक्षम अर्थव्यवस्था म्हणून पुढे येईल, यात शंका नाही.

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादिदी



आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज पहिला स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते. या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले.

आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दिनींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे...हे गाणे त्यांनी गायले म त्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला....हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले.

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. मराठीतही दिदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दिदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दिनींनी जवळपास एक हजार चित्रपटांतून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारीपासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले.

१९६९ साली भारत सरकारने त्यांना देशा-चा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रा-तील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअरकडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डी.लीट पदवी देऊन गौरविले. मागीलवर्षी ६ फेब्रुवारी रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशिवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही.

आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही.जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सावरगाव 'बालसंगम' अध्यक्षीय संवाद

**मायबोली मराठी परिषद, मुखेडच्या वतीने आज शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सावरगाव (पि.) ता. मुखेड जि. नांदेड येथे 'मायबोली बालसाहित्य संगम' संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त या संमेलनाचे अध्यक्ष बालसाहित्यिक दत्ता डांगे यांचा अध्यक्षीय संवाद येथे देत आहोत. -संपादक**



सावरगाव 'बालसंगम' अध्यक्षीय संवाद
या पृथ्वीमातेला वंदन
वाऱ्याला वंदन
पाण्याला वंदन
सूर्याला वंदन
चंद्राला वंदन
जन्म देणाऱ्या मातेला वंदन

वडासारखा आधार देणाऱ्या पित्याला वंदन. ज्या गावाने घडविले त्या माझ्या गावाला वंदन.

शाळेला वंदन, गुरुजनांना वंदन.

ज्यांच्या ज्यांच्यामुळे वाढलो...घडलो त्या सर्व सजीव.. निर्जीवांना वंदन!

मला या 'बालसंगमा'च्या प्रवाहात सामील करून घेतल्याबद्दल मायबोली मराठी परिषदेला आणि या परिषदेचे सर्व पदाधिकारी व तसेच सर्व सभासदांना वंदन!

बालसाहित्यसंगम ।।

'बालसाहित्यसंगम'... किती हृदयंगम हे नाव! 'बालसाहित्यसंगम' नाव समोर आले की, डोळ्यांसमोर फुलांची बागच येते. विविध रंगांची, निरनिराळ्या प्रकारची, लोभस अशी सुंदर सुंदर गुणां-सुगंधांची फुले वाऱ्यावर नाचणारी...आपल्या हाताशी...अंगाशी स्पर्श करणारी अन् आपल्याला मोहवणारी... आनंदाने मोहरवून टाकणारी फुले जीवनालाही सुगंधित करून टाकतात. हा दरवळ आपल्या जीवनभर पुरत असतो. अशीच संधी मायबोली मराठी परिषद मुखेडने 'बालसाहित्यसंगम' आयोजित करून आपल्याला मिळवून दिली आहे. 'बालसाहित्यसंगम' आपणां सर्वांचा जीवनप्रवाह विस्तृत करणारा आहे ही आनंदाची व समृद्धीची गोष्ट होय!

गावाचा अभिमान उरात ठेवा!

मुलांनो, ज्या गावात आपला जन्म झाला आहे. जे गाव आपले संगोपन करीत आहे. फुलझाडांची जशी काळजी घेतली जाते तसे ते आपली काळजी घेत आहे. आपल्यावर माया.. प्रेम करीत आहे... लोभ करीत आहे. आपण आजारी पडलो... किंवा काही लागून जखम झाली अथवा अपघात झाला तर संपूर्ण गाव आपल्या मदतीसाठी धावून येते. काळजी वाहते. या गावासाठी आपण एक लाडकं लेकरू असतो. सर्वांचे आवडते फुलपाखरू असतो. म्हणून देवावर जशी भक्ती असते तशी अशा या गावाविषयी हृदयात नितांत भक्ती ठेवा. गावातील थोरा-मोठ्यांचा आदर बाळगा. विमानात बसून कितीही उंचावर उडत राहिलोत तरीही आपले लक्ष जमिनीकडेच असते. तसे भविष्यात आपण मोठे झाल्यावर कोणत्याही शहरात अथवा दुसऱ्या देशात नोकरी निमित्ताने गेलोत तरीही लक्ष मात्र आपल्या गावाकडे ठेवा. गावाच्या हिताचा विचार करीत चला. जमेल तसे योगदान देत चला!

आपल्या गावावर जसे आपले प्रेम राहणार आहे तसेच प्रेम आपल्याला जन्म देणाऱ्या आणि जीवन घडविणाऱ्या आई-वडिलावर ठेवा. आपल्या भावा-बहिणींची काळजी घ्या. आपल्या शाळेविषयी जिव्हाळा ठेवा. आपल्या शालेय आणि गावातील सवंगड्यांबदल-मित्र-मैत्रिणींबद्दल मनात आत्मीयता रुजवा.

मुलांनो,

आपण लहान लहान गावांमध्ये राहतो. आपल्या आपल्या गावची... परिसराची एक भाषा असते. बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात... अन् ते खरेही आहे. तिथल्या भाषेत थोडे शब्द बदलतात. उच्चार बदलतो. शब्दांची हेल बदलते. जशी बैलगाडी रस्त्याने चालताना सर्व रस्ते सारखेच नसतात. काही ठिकाणी धुळीचे रस्ते असतात अशा ठिकाणी बैलगाडी कापसातून चालल्यासारखे वाटेल... काही ठिकाणी रस्ते खडकाळ असतात... तिथे गाडी खडखडाट करीत चालेल... काही ठिकाणी वाळू असेल तर गाडी गाडीचा आवाज बदलेल... शिजलेली दाळ लाकडी चाटूने हटताना जसे वाटते तसे वाटेल... ओहोळ किंवा नदीतून बैलगाडी नेताना तुपातून चमचा फिरवताना जसा मऊशार ...गेरदार स्वर येतो तसे वाटते. मस्त गंमत वाटेल! तसेच ठिकठिकाणच्या भाषेचेही असते! तिथल्या भाषेचा गोडवा... नाद काही औरच असतो. तिथल्या मातीचा स्वर गाडीच्या चाकाच्या चालण्याने वातावरणात उमटत असतो. तोच स्वर खरा असतो. तसेच आपण ज्या मातीत राहतोत... खेळतोत... वाढतोत...त्याच मातीचा स्वर आपल्या बोलीतून उमटत असतो! तीच आपली बोलीभाषा होय!

मुलांनो, पुस्तकांशिवाय दिवस नाही. पुस्तकांशिवाय रात्र नाही. पुस्तकांशिवाय इतिहास नाही. पुस्तकांशिवाय भविष्य नाही. हरघडी आपल्या हातात पुस्तक असते. शाळेत पुस्तक असते. शाळेतून जाता-येता आपल्या पाठीवर पुस्तक असते. घरी गेल्यावर अभ्यास करताना आपल्या मांडीवर पुस्तक असते. आपण थकून पलंगावर झोपून वाचतो तेव्हा आपल्या पोटावर-छातीवर पुस्तक असते. पुस्तक हातात नसेल आणि आपण टीव्ही पाहत असलो तरीही पुस्तकातून घेतलेली गोष्टच मालिकेतून दाखविली जाते. पुस्तकात लिहिलेले गाणेच टीव्हीवर दाखवितात. म्हणून आपण पुस्तकांशिवाय नाही. अन् पुस्तक आपल्याशिवाय नाही. पुस्तकानेच आपण आणि जग घडत असते. फुलांच्या नयनमनोहारी बागेत आपण उभे राहिलो तर किती छान वाटते ना! जणू आपण एक फुलपाखरूच झालेले असतोत. तसेच आपण पुस्तकांच्या बागेतील फुलपाखरू असतात. पुस्तकातला मकरंद... मध गोळा करीत असतोत! सुंदर मधाचे पोळे आपण बनवत असतोत.

मुलांनो, या पुस्तकांमुळे आपण घडत असतो. मोठे होत असतो. म्हणून तेव्हा आपलेही कर्तव्य आहे की, 'पुस्तकांना आपणही घडविले पाहिजे!'...'पुस्तकांना आपणही घडविले पाहिजे!' असे म्हटल्यावर आपणाला आश्चर्य वाटले असेल नाही का! की आपण पुस्तकांना कसे घडविणार? तसे वाटणे साहजिकच आहे. पण हे बघा मुलां-मुलींनो, तुम्ही लेखक/लेखिका आहातच... तुम्ही लिहायलाच हवे!

मुलां-मुलींनो, तुम्हाला परीक्षेत एखाद्या विषयावर निबंध लिहायला सांगितले जाते. आणि तुम्ही मन लावून... विचार करून सुंदर निबंध लिहिता. तुम्हाला काही मुद्दे दिले जातात आणि त्यावरून कल्पनाविस्तार करून गोष्ट लिहायला सांगितली जाते. तुम्ही मुद्दे वाचता. मनाशी काही विचार करता आणि त्या मुद्द्यांना धरून तुम्ही मस्त गोष्ट लिहिता. कवितेवर प्रश्न विचारला जातो. तुम्ही त्यावरही चिंतन करून उत्तर लिहिता... म्हणजे तुम्ही समीक्षक झालात. म्हणजे तुम्ही लेखकच झालात की! कधी कधी तुम्ही निसर्गरम्य ठिकाणी असता... त्यावेळी तुमच्या मनातून कवितेच्या ओळी तरळून जातात... फक्त तुम्ही त्या लगेचच लिहून काढीत नाहीत. त्या लगेचच लिहून काढीत जा... तुम्हीही कवी/कवयित्री आहात. साहित्य म्हणजे काय...?

मुलांनो, काळ बदलतो. भौतिक गोष्टी बदलतात... पण हजारो वर्षांपासूनच माणूस मात्र तोच आहे. हजारो वर्षांपासून त्याचे जे जीवन जगण्याचे विचार असतात... तेच विचार आजही आहेत... उद्याही राहणार आहेत... फक्त सोईसुविधा बदलत राहतील एवढेच काय ते! पूर्वी प्रवासासाठी बैलगाडी होती, घोडे होते. आता मोटारसायकली आल्या, कार आल्या. विमाने आली. पूर्वी लिहिण्यासाठी खापराच्या किंवा पत्र्याच्या काळ्या पाट्या होत्या. लेखणी होती. आता टॅब येत आहेत, लॅपटॉप आहेत. सांगायचा मतलब म्हणजे आपल्याला तांत्रिकदृष्ट्या खूप सोईसुविधा लाभत आहेत. परंतु माणूस मात्र शरीराने, विचाराने जशाला तसाच असतो. म्हणून आपल्याला आपला माणूस महत्त्वाचा आहे. मोबाईल येतील मोबाईल जातील... कॉम्प्युटर येतील कॉम्प्युटर जातील... अजून काही यंत्र येतील जातील... परंतु आपलं मन मात्र तेच राहील...हजारो वर्षांपासून माणसाला..हवा..पाणी...प्रकाश...निवारा आणि माणुसकी याचीच गरज आहे. बाकी गोष्टी नसल्या तरी चालतात. माणूस आणि माणुसकी यांची आपल्याला गरज आहे. पुढेही राहणारच आहे. म्हणून माणसांना जपा. माणुसकीला जपा...

आपले आजी-आजोबा, आई-वडील, मित्र-मैत्रिणी, गुरुजन वर्ग या सर्वांना जपा. शेवटी...प्रार्थना करूया

१) आजी.. आजोबांची... आई बाबांची सेवा करीन २) गुरुजनांची आज्ञा पाळीन, ३) आई बाबांचे.. बहिणींचे.. भावांचे.. मित्र.. मैत्रिणींचे कोणाचेही कधीही मन दुखावणार नाही. ४) दैनंदिनी लिहीन.

# 'व्हॅलेंटाईन वीक'-युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा सप्ताह

'प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या



याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.

या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

**-सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

# जर्मनीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीला दिली भेट

**मुंबई (प्रतिनिधी)** - जागतिकस्तरावर नाविन्यता परिसंस्था अधिकाधिक परस्परांशी जोडल्या जात आ-हेत या पार्श्वभूमीवर जर्मनीतील कार्लस्रुहे शहराच्या (City of Karlsruhe, Germany) प्रतिनिधीमंडळाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीला दिलेली भेट ही महाराष्ट्र आणि जर्मनी यांच्यात नाविन्यताधारित विकासाबाबत वाढत असलेल्या सहकार्याचे द्योतक ठरली आहे.

जर्मनीतील कार्लस्रुहे हे शहर अग्रगण्य तंत्रज्ञान व नाविन्यता केंद्र म्हणून ओळखले जाते. कार्लस्रुहे शहराच्या व्यवसाय विकास विभागाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या भेटीचा उद्देश स्टार्टअप्स, प्रगत उत्पादन (dvanced Manufacturing), कौशल्यविकास आणि धोरणाधारित उद्योजकता या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन सहकार्याच्या संधींचा शोध घेणे हा होता. या भेटीतील संवादादरम्यान दोन्ही भागातील स्टार्टअप परिसंस्थेच्या व्यापक चर्चा करण्यात आली. तंत्रज्ञानाधारित उद्योगवाढ, औद्योगिक व उत्पादन क्षेत्रातील नाविन्यता, कौशल्यविकास तसेच उद्योजकतेसाठी सार्वजनिक धोरणांची भूमिका या विषयांवर सविस्तर विचारमंथन झाले. शाश्वतता, नाविन्यता प्रशासन आणि चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी भारत व जर्मनी सहकार्य अधिक बळकट करण्याची गरज अधोरेखित केली. भविष्यातील भागीदारी ही केवळ औपचारिक भेटींपुरती न राहता संयुक्त कार्यक्रम, सामायिक नाविन्यता उपक्रम आणि स्टार्टअप्स व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (MSMEs) अधिक सशक्त बाजारपेठ प्रवेशाच्या संधी निर्माण करणारी असावी, असे त्यांनी नमूद केले. तसेच महाराष्ट्रात नाविन्यता क्षमतेचा विकास करण्यासाठी राज्य नाविन्यता सोसायटी कडून दिल्या जाणाऱ्या सहाय्य, परिसंस्था उभारणी आणि आंतरराष्ट्रीय संलग्नतेबाबत त्यांनी माहिती दिली.

## थोडक्यात...

### रविवारी ‘रमाई पहाट‘चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)-** भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त नांदेडमध्ये रमाई पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील कुसुम सभागृह येथे रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त नांदेड येथील प्रसिद्ध गायिका अनुपमा अनंत पाटील संचलित सुर-संगम संचाच्या वतीने अनेक मान्यवर गायक, कलावंत गितगायन करणार आहेत. तेव्हा नांदेडकरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आवाहन मानव कल्याण विचार मंचचे अध्यक्ष जगनराव गोणारकर, सचिव प्रा. अशोक कांबळे, डॉ. मिलिंद पांडुर्णीकर, एम. टी. वाघमारे, साहेबराव कांबळे, संजय वाघमारे, सुमेध शिरसे, राहुल गोणारकर, संतराम टोम्पे, प्रा. डॉ. गंगाधर भोपाळकर, जिवनराव कांबळे, विलास कांबळे, डॉ. राजीव वाघमारे, संभाजी वाघमारे, सुधीर वाघमारे यांच्च्यासह अनेकांनी केले आहे.

### शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतीविक्रेत्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)-** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील भूमिहीन, दारिद्रेषेखालील शेतमजूर कुटुंबांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती शेतजमीन उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने सुरू केली आहे.

या योजनेअंतर्गत शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना कोरडवाहू शेत जमिनीसाठी प्रति एकर ५ लाख रुपये मर्यादेच्या आत तसेच बागायती शेतजमिनीसाठी प्रति एकर ८ लाख रुपये मर्यादेच्या आत जिल्हास्तरीय समितीमार्फत वाटाघाटी करुन मोबदला अदा करण्यात येतो. जिल्ह्यात शेतजमीन विक्री करण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकरी व व्यक्तींनी आवश्यक कागदपत्रांसह शेतजमीन विक्रीचे प्रस्ताव सादर करावेत.

# नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी घेतला सखोल आढावा

**नांदेड (प्रतिनिधी) -** आरोग्य सेवा प्रभावी, दर्जेदार आणि लोकाभिमुख करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, अशा सूचना आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी दिल्या. बुधवार, ४ फेब्रुवारी रोजी त्यांनी नांदेड जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाला भेट देऊन जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेतला.




यावेळी आयोजित आढावा बैठकीत डॉ. कंदेवाड यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजावर सखोल चर्चा केली. या बैठकीत सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानावर विशेष भर देण्यात आला. अभियानांतर्गत जास्तीत जास्त नागरिकांची तपासणी करून त्यांना वेळेवर व योग्य उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. सिकलसेल आजाराच्या नियंत्रणासाठी तपासणी, समुपदेशन व उपचार या तिन्ही बाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

सिकलसेलसह कुष्ठरोग व क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, कुटुंब कल्याण योजना, माता व बाल संगोपन सेवा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम, कॉम्प्रिहेन्सिव्ह हेल्थकेअर तसेच आयपीएचएस (खझक्ड) मानकांची प्रभावी अंमलबजावणी या विषयांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम ठरविलेल्या उद्दिष्टांनुसार राबवून आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवण्याचे निर्देश डॉ. कंदेवाड यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

या महत्त्वपूर्ण बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हिराणी, सह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुटे, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा कुष्ठरोग अधिकारी डॉ. शेख बालन, आयुष अधिकारी डॉ. मुरमुरे तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती रेणुका दराडे उपस्थित होत्या. याशिवाय सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे अधिकारी, कर्मचारी व समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंदिरा कॉलेजमध्ये सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीर संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी) -** इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी विष्णुपुरी, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे महादेव पिंपळगाव येथे दि. २८ जानेवारी २०२६ ते ०३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सात दिवसीय शिबिराचा समारोप उत्साहात संपन्न झाला.



समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे होते. तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महादेव पिंपळगावच्या सरपंच वर्षा खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य कपिल दुधमल तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक आर. के. कदम यांनी सात दिवसांच्या शिबिरात स्वयंसेवकांनी राबवलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर लेखाजोखा अहवालाद्वारे सादर केला. या शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी गावातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता करून प्लास्टिक संकलन, जलसंधारण, सेंद्रिय शेती व भूमी विकास, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, बालविवाह प्रतिबंध, अंधश्रद्धा निर्मूलन, रस्ता सुरक्षा, सायबर सुरक्षा तसेच मतदार जनजागृती असे विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबवले.

प्रमुख अतिथी डॉ. मारुती गायकवाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाश्वत विकास व जलसंधारणाचे महत्त्व विशद करत स्वयंसेवकांना समाजाभिमुख कार्यासाठी प्रेरित केले. तसेच प्रा. डॉ. सूर्यकांत जाधव यांनी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. सरपंच वर्षा खंडागळे आणि कपिल दुधमल यांनी ग्रामस्थांच्या वतीने शिबिराबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विजय नवघरे यांनी गावकरी व विद्यार्थ्यांनी शिबीर यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच अशा शिबिरांमधून विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत जीवनमूल्ये रुजतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी स्वयंसेवक राम जाधव आणि ओंकार शिंदे यांनी शिबिरातील अनुभव कथन करून आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद रिजवान यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. के. कदम यांनी केले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. पल्लवी कांबळे, डॉ. प्रवीण कारले, प्रा. मेघा गाजले, महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी, महादेव पिंपळगाव येथील सुजाण नागरिक तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिडको परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाची संयुक्त बैठक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** नवा मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २० मधील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आणि आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक ३ फेब्रुवारी रोजी पार पडली. या बैठकीत बंद असलेले हातपंप तातडीने दुरुस्त करणे, पाणीपुरवठा व मलनिःसारणाच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यावर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

सिडको क्षेत्रीय कार्यालयात आयोजित या बैठकीला नवनिर्वाचित नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, राजू लांडगे यांच्यासह सतीश बसवदे, माजी नगरसेवक संजय इंगेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासनाच्या वतीने पाणीपुरवठा शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, उपअभियंता प्रकाश कांबळे, कनिष्ठ अभियंता रवींद्र सरपाते व कार्यालयीन कर्मचारी निमकर उपस्थित होते.

दरवर्षी उन्हाळ्यात सिडको परिसरात पाणीटंचाईची समस्या तीव्र होते. यंदा ही परिस्थिती ओढवू नये यासाठी प्रशासनाने आत्तापासूनच खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली. विशेषतः प्रभागातील बंद अवस्थेत असलेले हातपंप तातडीने दुरुस्त करून ते कार्यान्वित करावेत, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल, असे अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

पाणीपुरवठ्यासोबतच मलनिःसारण (ड्रेनेज) विभागाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचा सूर बैठकीत उमटला. नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने अधिक तत्परतेने काम करावे, अशा सूचना उपस्थित नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना केल्या. या बैठकीत प्रशासनानेही सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आश्वासन उपस्थित अधिकाऱ्यांनी दिले.

# धार्मिक श्रद्धा अन् लोकसंस्कृतीचा संगम : रातोळी येथील रोकडेश्वर यात्रेत लावणी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नायगाव (प्रतिनिधी)-** तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मौजे रातोळी येथे श्री क्षेत्र रोकडेश्वर देवाच्या वार्षिक यात्रेनिमित्त ‘लोककला व लावणी महोत्सवाचे’ आयोजन मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या महोत्सवाच्या निमित्ताने रातोळी परिसरात धार्मिक श्रद्धा, लोकसंस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा त्रिवेणी संगम पाहायला मिळाला.



यात्रेनिमित्त मंगळवारी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मांदियाळी होती. श्री रोकडेश्वर देवाच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी हजेरी लावली. सकाळी अभिषेक, विशेष पूजाअर्चा आणि महाआरती अशा विविध धार्मिक विधींनी उत्सवाची सुरुवात झाली. दिवसभर ‘रोकडेश्वर महाराज की जय’च्या घोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

सायंकाळी यात्रेचे मुख्य आकर्षण असलेला भव्य ‘लोककला व लावणी महोत्सव’ सुरू झाला. यामध्ये नामवंत कलाकारांनी पारंपरिक लावणी, पोवाडे आणि विविध लोकगीते सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. ठसकेबाज लावणी आणि ढोलकीच्या तालावर रसिक प्रेक्षक अक्षरशः डोलू लागले. कलेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या मातीतील संस्कृतीचे दर्शन या महोत्सवातून घडले.

या महोत्सवासाठी रातोळीसह परिसरातील गावांमधून अबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. केवळ मनोरंजनच नव्हे, तर लोकसंस्कृतीचे जतन आणि समाजात एकोपा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा सोहळा यशस्वी करण्यात आला. यात्रोत्सवामुळे गावात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी व यात्रा कमिटीने या सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते.

# एक आदर्श आई-वडील म्हणून पालकांनी वागावे -प्रा. गणेश शिंदे

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)-** ‘जे पेरतो ते उगवते’ या उक्तीप्रमाणे पालकांनी आपल्या मुलांसोबत वागताना एक आदर्श आई-वडील म्हणून वागावे. पालक जसे वागतात तसे मुले वागतात, म्हणून मुलांसोबत मनमोकळेपणाने बोलावे व त्यांच्याशी मुक्तपणे संवाद करावा, असे आवाहन प्रा. गणेश शिंदे यांनी के. रामलू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आनंदाचा पासवर्ड या कार्यक्रमात केले.



कुंडलवाडी येथील के. रामलू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आनंदाचा पासवर्ड हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम शहरातील शिवम मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष प्रेरणा कोटलावार तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे, मनोविकार तज्ज्ञ डॉ. रोहित ठक्करवाड, डॉ. उमेश आत्राम, साईनाथ उत्तरवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, मीना काकाणी आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना संबोधताना प्रा. गणेश शिंदे यांनी सांगितले की, पालकांनी विद्यार्थ्यांवर त्यांच्या शैक्षणिक करिअरविषयी त्यांच्यावर दबाव टाकू नये तर त्यांच्यासोबत मनमोकळेपणाने संवाद साधून एक आदर्श आई, वडील होण्याचा प्रयत्न करावा. पालक घरात जसे वागतात तसे विद्यार्थी घडतात म्हणून पालकांनी पहिल्यांदा स्वतः आदर्श निर्माण व्हावा असे वागावे, प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचे चारचौघांत कौतुक करावे तर चुका मात्र कानात सांगाव्यात असा सल्ला दिला.

# राज्य शासनामार्फत एकदिवसीय महानिर्यात इग्नाईट कार्यशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)-** राज्यात निर्यात क्षेत्रास चालना देणे, रोजगार निर्मितीला गती देणे तसेच निर्यात वाढीसाठी प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या ‘जिल्हा हे निर्यात केंद्र’ या उपक्रमास प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अनुषंगाने राज्य शासनामार्फत ‘महानिर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६’ अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत जिल्ह्यातील निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक यांच्यासाठी उद्योग वाढीच्या संधी, उत्पादनांची निर्यात क्षमता, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, तसेच डीजीएफटी, निर्यात नोंदणी, धोरणे व सुलभ प्रक्रिया यासंदर्भात तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमुळे उद्योजकांना निर्यात क्षेत्रातील नव्या संधींची माहिती मिळून जिल्ह्यातील उद्योगांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळविण्यास मदत होणार आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक, निर्यातक्षम उद्योगांचे प्रतिनिधी, बँक अधिकारी तसेच औद्योगिक विकासाशी संबंधित विविध शासकीय विभागांचे प्रमुख यांनी या एकदिवसीय कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शन सत्रांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांनी केलेले संस्कार मोलाचे -संजय वारकड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** ज्येष्ठ नागरिकांनी केलेले संस्कार मोलाचे असून, त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांनी केले. ते ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र वितरण सोहळा प्रसंगी सिडको येथील विरंगळा केंद्रात बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक तेरकर यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे, म्हणून समाज कल्याण अधिकारी शिवानंद मिनगिरे, स्वप्नील दिगलवार, जयवंत सोमवाड, बालाजी इंगेवाड, सुनिता तेरकर, ॲड. सिद्दीकी, विश्वनाथ शिंदे, विजय जोंधळे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार संजय वारकड यांनी ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन ज्येष्ठ मंडळींनी घडविलेले संस्कार आजही मोलाचे असल्याचे सांगून ज्येष्ठ नागरिक कायदा २००७ नुसार ज्येष्ठांसाठी विविध सोयीसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.

समाज कल्याण अधिकारी शिवानंद मिनगिरे यांनी जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त राहून दर तीन महिन्याला ज्येष्ठ नागरिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी बैठक घेतली जात असल्याचे सांगितले.

यावेळी प्रास्ताविक विश्वनाथ शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन भागिरथी बच्चेवार यांनी केले. यावेळी जवळपास १५० ज्येष्ठ नागरिक महिलांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक व महिला उपस्थित होत्या.

# दहावी-बारावी परीक्षेसंदर्भात हेल्पलाईन

**नांदेड (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसंदर्भात अडचणी सोडविण्यासाठी विभागीय मंडळ स्तरावर इयत्ता १० वी साठी ०२३८२-२५१६३३ व इ. १२ वीसाठी ०२३८२-२५१७३३ ही हेल्पलाईन सुरु करण्यात आलेली आहे. सदर हेल्पलाईनसाठी नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.

चवरे ए.पी. (वरिष्ठ अधिक्षक तथा (प्र.) सहाय्यक सचिव) मो. नं. ९४२१७६५६८३. उच्च माध्यमिक इ. १२ वी साठी कारसेकर जे. एस. (सहाय्यक अधिक्षक तथा (प्र.) व.अ.) - मो. नं. ९८२२८२३७८०. पवार एन. पी. (पर्यवेक्षक लिपीक) - मो. नं. ९८३४४६४१७७. राठोड ए. सी. (वरिष्ठ लिपीक)- मो. नं. ९५४५२४२७२६.

माध्यमिक इ. १० वी साठी केंद्रे एम. व्ही. (सहाय्यक अधिक्षक तथा (प्र.) व. अ.)- मो. नं. ९४२१२५८११६. वैद्य एन. एल. (पर्यवेक्षक लिपीक)- मो. नं. ७९७२५६३८१७. सूर्यवंशी ए. एल. (कनिष्ठ लिपीक)- मो. नं. ७६२०१६६३५४ हे नंबर दिले आहेत.

विद्यार्थी, पालक व शाळा प्रमुखांनी आपल्या अडीअडचणींविषयी वरील तसेच पुढील समुपदेशकांशी दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकावर सकाळी ८ ते सायं. ८ या वेळेत संपर्क साधावा. माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२६ भयमुक्त, तणावमुक्त परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना व इतर घटकांना त्यांच्या अडीअडचणी सोडवता याव्यात यासाठी विद्यार्थी-पालक यांचेसाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असून आवश्यकतेनुसार पुढीलप्रमाणे समुपदेशकांशी संपर्क करता येईल, असे आवाहन विभागीय सचिव लातूर विभागीय मंडळ लातूर यांनी केले आहे.

# डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये ‘युथ उत्सव’ उत्साहात संपन्न

**लोहा (प्रतिनिधी)-** येथील डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन युथ उत्सव मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कला व क्रीडा कौशल्यांचे दर्शन घडले. सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आणि मान्यवरांचे मार्गदर्शन अशा भरगच्च उपक्रमांनी हा सोहळा संस्मरणीय ठरला.



युथ उत्सवाच्या पहिल्या दिवशी बॉलीवूड डे आणि वैचारिक प्रबोधन विद्यार्थ्यांनी ’बॉलीवूड थीम’नुसार वेशभूषा करून परिसरात रंगत आणली. कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक शिव आरतीने झाली. कु. तृप्ती हिच्या स्वागत नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. गोविंद नांदेडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांप्रमाणे १८ ते २१ तास अभ्यासाचा व्यासंग जोपासावा. पहाटे उठून पुस्तकांशी नाते जोडा, जेणेकरून तुमचे ज्ञानच तुमचा शब्द आणि विश्वास बनेल.

**पान १ वरून...**

**महापालिकेच्या महापौर निवडीची...**

प्रतिनिधींची महापौर पदाबाबतची मते जाणून घेण्यात आली. दरम्यान भाजपने प्रदेश कोअर कमिटीचे नाव पुढे केले असले तरी खा. अशोकराव चव्हाण जे नाव अंतिम करतील तोच महापौर होईल हे मात्र निश्चित मानले जात आहे. मात्र भाजपाच्या पहिल्या महापौर पदाचा मान कुणाला मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी गुरुवारी भाजपच्या नगरसेवकांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये कोअर कमिटीसाठी चार नावे देण्याचा निर्णय झाला. त्यामध्ये शांभवी साले, सुदर्शना खोमणे, ज्योती कल्याणकर, कविता मुळे, वैशाली देशमुख यांच्या नावांची चर्चा आहे.

-----------

**दारूच्या नशेत एकाने...**

उपचारासाठी दाखल केले, परंतु मोठ्या प्रमाणात भाजल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याच्या आईच्या माहितीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. त्याने आत्महत्या का केली? याचे अद्याप कारण स्पष्ट झाले नसल्याचे पोलिसांनी सांगितले, पण तो दारूच्या सवयीचा होता असेही पोलिसांनी सांगितले आहे.

-----------

**कुवैतमध्ये मुखेडच्या तरुणाचा...**

दरम्यान, या प्रकरणाची चौकशी सुरू होणार का? तसेच भारतीय दूतावासाकडून कोणती पावले उचलली जातात? याकडे नांदेड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

# अंतर्मन

## महाशिवरात्रीला 19 वर्षांनंतर लक्ष्मी नारायण योगाचा शुभ संयोग!

'या' 5 राशींच्या लोकांवर होईल महादेवाची महाकृपा



**या वर्षीच्या महाशिवरात्रीला १९ वर्षांनंतर लक्ष्मी नारायण योगाचा दुर्मिळ संयोग घडून येणार आहे. त्यामुळे महाशिवरात्रीला भगवान शिवाच्या आशीर्वादाचा शिवभक्तांना प्रचंड लाभ होईल. या प्रसंगी राहू शांती आणि कालसर्प दोष शांती विधी करणेदेखील शुभ राहील. भगवान शिवाची पूजा केल्याने केवळ अशुभ ग्रहांचे परिणाम कमी होणार नाहीत तर देवी लक्ष्मीच्या कृपेने संपत्ती आणि समृद्धीमध्ये वाढ होईल. या शुभ संयोगामुळे ५ राशींच्या लोकांवर महादेवाची महाकृपा होणार आहे.**

### मेष

बुध आणि शुक्र मेष राशीच्या ११ व्या घरात युती करतील. या युतीमुळे तुम्हाला आर्थिक लाभ होईल. भगवान शिवाच्या आशीर्वादाने तुम्हाला नवीन कमाईच्या संधी मिळू शकतात. तुमच्या भावंडांकडूनही तुम्हाला पाठिंबा मिळेल. त्यांच्या मदतीने कोणतेही रखडलेले काम पुढे जाऊ शकते. सामाजिक संबंध मजबूत होतील आणि तुमची प्रतिमा पूर्वीपेक्षा मजबूत होईल. व्यवसाय पुढे नेण्याच्या संधी देखील मिळतील.

### वृषभ

वृषभच्या दहाव्या घरात होणारे हे संक्रमण तुमची कामगिरी आणि सार्वजनिक प्रतिमा वाढवेल. सरकारी विभागांशी संबंधित कामात यशस्वी व्हाल. तुम्हाला तुमच्या नोकरी आणि व्यवसायातही यश मिळेल. तुमच्या अनुभवामुळे तुम्हाला नवीन जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात. तुमची सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. तुम्हाला एखादी महत्त्वाची कामगिरी देखील मिळू शकते.

### मिथुन

तुमच्या राशीच्या नवव्या घरात लक्ष्मी नारायण योगाची उपस्थिती तुमच्या नशिबावर प्रभाव पाडेल. परिणामी, तुम्हाला नशिबाचे पूर्ण समर्थन मिळेल. जीवनात आनंद आणि समृद्धीच्या नवीन संधी तुमची वाट पाहत आहेत. तुमच्या वडिलांकडून आणि वरिष्ठांकडून मिळालेल्या सहकार्यामुळे भविष्यात तुम्हाला फायदा होईल. या काळात लांब पल्ल्याच्या प्रवासाची शक्यता देखील आहे. कामासाठी किंवा व्यवसायासाठी प्रवास फायदेशीर ठरेल. उच्च शिक्षण घेण्याची तुमची इच्छादेखील पूर्ण होताना दिसते. तथापि, तुमचा अध्यात्माकडे थोडासा कल असेल आणि भोलेनाथांच्या आशीर्वादाने तुमच्या चिंता आणि चिंता दूर होतील.

### सिंह

महाशिवरात्रीला लक्ष्मी नारायण योग तुमच्या राशीच्या सातव्या घरात असेल. यामुळे तुमच्या कौटुंबिक जीवनात प्रेम आणि सुसंवाद वाढेल. कुटुंबातील सदस्यांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल. तुमच्या संपर्कांचे वर्तुळ विस्तारेल आणि नवीन भागीदारीदेखील तयार होऊ शकतात. या काळात तुम्हाला तुमच्या भागीदारांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल. भागीदारीत तुम्ही घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला तुमच्या जोडीदाराकडून पाठिंबा मिळेल. तुम्हाला लांबचा प्रवास करण्याची किंवा परदेशात स्थायिक होण्याची संधी मिळू शकते. वैवाहिक जीवन सुसंवादी असेल आणि तुमच्या जोडीदारासोबतचे तुमचे नाते मजबूत होईल. यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

### तुळ

महाशिवरात्रीला तूळ राशीच्या पाचव्या घरात लक्ष्मी नारायण योग तयार होईल. या प्रभावामुळे नशीब उजळेल. बुद्धीने तुम्ही कठीण कामे देखील सहजतेने सोडवू शकाल. सर्जनशील क्षमतेचा तुम्हाला फायदा होईल. या काळात तुम्हाला तुमच्या मुलांकडूनही चांगली बातमी ऐकायला मिळेल. तुम्हाला स्पर्धा परीक्षेतही यश मिळू शकेल. भूतकाळातील पुण्यकर्मांचाही फायदा होईल. मागील कामाचाही फायदा होईल. करिअर वाढीच्या संधी उपलब्ध होतील. धोकादायक उपक्रमांमध्येही तुम्ही नफ्याच्या संधी मिळवू शकाल.

# वर्षातील पहिला शनि प्रदोष व्रत कधी?

## भगवान शिव अन् शनिदेवाचे मिळतील आशीर्वाद; तारीख, शुभ वेळ आणि उपासनेची पद्धत जाणून घ्या...

**२०२६ वर्षातील पहिले शनि प्रदोष व्रत खूप खास असणार आहे. हिंदू धर्मात प्रदोष व्रतांना विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान शिवाची पूजा करण्याची प्रथा आहे. असे केल्याने भगवान शिवाचे विशेष आशीर्वाद मिळू शकतात आणि जीवनात आनंद आणि समृद्धी टिकून राहते, असे मानले जाते. या वर्षी प्रदोष व्रत शनिवारी आहे. परिणामी, हे वर्षातील पहिला शनि प्रदोष व्रत असेल. त्यामुळे या दिवशी भगवान शिव तसेच भगवान शनिदेवाचे आशीर्वाद मिळू शकतात. शनि प्रदोष व्रत, त्याचा शुभ मुहूर्त आणि पूजेची पद्धत याबद्दल सविस्तर जाणून घेऊया...**

कॅलेंडरनुसार, फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशी तिथी १४ फेब्रुवारी रोजी शनिवार रोजी दुपारी ४:०२ वाजता सुरू होईल. दुसऱ्या दिवशी, रविवार, १५ फेब्रुवारी रोजी त्रयोदशी तिथी ५:०५ वाजता संपेल. म्हणून, प्रदोष काळाच्या गणनेनुसार, १४ तारखेला प्रदोष व्रत असेल. हा दिवस शनिवारशी जुळत असल्याने, त्याला शनि प्रदोष व्रत म्हणतात. म्हणून, या तारखेला पूजा आणि उपवास केल्याने भगवान शिव आणि शनिदेव यांचे आशीर्वाद मिळू शकतात.







### व्रतासाठी प्रार्थना पद्धत

संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी, पांढरे कपडे परिधान करा आणि भगवान शिवाची पूजा करा. त्यानंतर, भगवान शिवाला ताजी फुले, बेलपत्रे आणि इतर वस्तू अर्पण करा. भगवान शिवाची पूजा केल्यानंतर, आरती आणि भजन करा. यामुळे भगवान शिव प्रसन्न होतात आणि त्यांचे आशीर्वाद भक्तांवर राहतात. प्रदोष व्रत शनिवारी असल्याने, उपवास करणाऱ्या व्यक्तीने भगवान शनिदेवाची देखील पूजा करावी. पिंपळाच्या झाडाला पाणी अर्पण करावे आणि शनि स्तोत्र आणि चालिसाचे पठण करावे. संध्याकाळी भगवान शिवाचा मंत्र ॐ नमः शिवाय किंवा महामृत्युंजयचा जप करावा. यामुळे भगवान शिव आणि भगवान शनिदेव यांचे आशीर्वाद मिळू शकतात. शिवाय, उपवास करणाऱ्या व्यक्तीच्या इच्छा पूर्ण होऊ शकतात.

### शनि प्रदोष व्रत शुभ मुहूर्त


प्रदोष काळात संध्याकाळची प्रार्थना करणे सर्वोत्तम मानले जाते. १४ तारखेला प्रदोष काळ संध्याकाळी ५:२५ ते ६:५५ पर्यंत असेल हे लक्षात ठेवावे. प्रदोष काळ सूर्यास्ताच्या अंदाजे ४५ मिनिटे आधी आणि ४५ मिनिटे नंतर आहे. या काळात प्रदोष व्रत पूजा करणे सर्वोत्तम मानले जाते.

### शनि प्रदोष व्रत पूजा पद्धत

सकाळी लवकर उठा, स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला. चौरंगावर एक कापड ठेवा. त्यावर भगवान शिव आणि देवी पार्वतीची मूर्ती किंवा चित्र ठेवा. सर्वत्र गंगाजल शिंपडा आणि भगवान शिव यांना दही, दूध, गंगाजल आणि मधाने अभिषेक करा. भगवान शिवाला बेलपत्र, फुले, चंदन, नैवेद्य, धूप, दिवे आणि इतर वस्तू अर्पण करा. तसेच, देवी पार्वतीला मेकअपच्या वस्तू अर्पण करा. भगवान शिव आणि देवी पार्वतीची विधीनुसार पूजा करा. या दिवशी भगवान गणेशाची पूजा करणे देखील आवश्यक आहे.

# अंगठ्याचा आकार उलगडतो रहस्ये...

**हस्तरेषाशास्त्रात अंगठ्याला विशेष महत्त्व आहे, कारण ते इच्छाशक्तीचे केंद्र आहे आणि ते थेट मेंदूशी जोडलेले आहे. हस्तरेषाशास्त्रानुसार, अंगठ्याचा आकार आणि लांबी पाहूनच व्यक्तीच्या स्वभावाबद्दल आणि भविष्याबद्दल बरेच काही शिकता येते. अंगठ्याचा आकार तीन भागांमध्ये पाहता येतो : कोण, समकोण आणि न्यूनकोण. चला या तीन प्रकारच्या अंगठ्यांचा शोध घेऊया आणि त्या व्यक्तीच्या भविष्याबद्दल, विचारांबद्दल आणि स्वभावाबद्दल जाणून घेऊया...**



- तर्जनीच्या बोटासोबत मिळून कोण बनवणारा अंगठा : हस्तरेषाशास्त्रानुसार, तर्जनी बोटासोबत कोण बनवणारा अंगठा सुंदर, पातळ आणि लांब असतो, ज्यांना सात्विक अंगठा असेही म्हणतात. असा अंगठा असलेल्या लोकांना सौम्य आणि गोड स्वभावाचे मानले जाते. ते कलाकार, गायक असू शकतात किंवा समाजात सर्जनशील कामात जास्त रस दाखवू शकतात. असा अंगठा असलेल्या लोकांना बालपणात संघर्षांचा सामना करावा लागतो, परंतु त्यांच्या प्रयत्नांनी आणि इच्छाशक्तीने ते यश मिळवतात. याव्यतिरिक्त, ते घरातील परिस्थिती स्वतःच्या फायद्यासाठी अनुकूल करतात.
- अतिशय लांब अंगठा असणे : असे मानले जाते की जास्त लांब अंगठा शुभ मानला जात नाही. जर अंगठ्याची लांबी तर्जनी बोटाच्या दुसऱ्या कांडीपर्यंत पसरली असेल, तर अशा लोकांना यशाच्या मार्गावर मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागू शकते. तथापि, जर अंगठ्याची लांबी सम आणि प्रमाणबद्ध असेल, तर असे लोक बुद्धिमान असतात. त्यांना कला देखील आवडते. त्यांचे मित्र कमी असतात, परंतु त्यांच्याकडे जे काही आहे ते अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहतात.
- तर्जनी बोटाने काटकोन बनवणारा अंगठा : हस्तरेषाशास्त्रानुसार, तर्जनी बोटाने काटकोन बनवणारा अंगठा मजबूत, सुंदर आणि खांबासारखा दिसतो. असे अंगठे मागे वाकत नाहीत. असे लोक कमी बोलतात आणि जास्त काम करतात. कठोर परिश्रमाने यश मिळवण्यावर त्यांचा विश्वास असतो. त्यांचा राग लवकर शांत होतो. एकदा त्यांनी एखाद्या गोष्टीवर मन लावले की, ते साध्य करण्यासाठी दृढनिश्चयी असतात. हे लोक दृढनिश्चयी, देशभक्त आणि सामाजिक कार्यासाठी समर्पित असतात.
- तळहातावर तर्जनीसोबत न्यूनकोण बनवणारा अंगठा : अशा अंगठ्याची लांबी सामान्यपेक्षा लहान असू शकते. त्यांचा आकारही विकृत दिसू शकतो. असा अंगठा असलेले लोक स्वभावाने काहीसे निराशावादी असू शकतात. त्यांना जीवनात आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. त्यांना धार्मिक कार्यात फारसा रस नसतो. जीवनात कोणतेही महत्त्वाचे फायदे मिळविण्यासाठी त्यांना खूप मेहनत आणि प्रयत्न करावे लागतात. त्यांचे जीवन संघर्षांनी भरलेले असू शकते. शिवाय, हस्तरेषाशास्त्रानुसार, असे लोक कधीकधी त्यांच्या कामात आळस दाखवू शकतात.

# विजया एकादशीचे व्रत कधी आहे?

## तारीख, महत्त्व, उपासनेची पद्धत जाणून घ्या...

**दरवर्षी फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षातील एकादशी तिथीला विजया एकादशी व्रत पाळले जाते. शास्त्रांमध्ये एकादशी व्रत सर्वोत्तम मानले जाते. कारण हे एकमेव व्रत आहे, ज्याचे पुण्य दुसऱ्या व्यक्तीला दान केले जाऊ शकते. हे व्रत पाळणाऱ्यांनाही मोक्ष मिळतो. विजया एकादशी १३ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाईल. असे मानले जाते की हे व्रत पाळल्याने शत्रूंवर विजय मिळतो. असेही मानले जाते की हे व्रत पाळल्याने आणि भगवंताच्या मंत्रांचा जप केल्याने जीवनातील अडचणी दूर होतात आणि यशाचा मार्ग मोकळा होतो.**

विजया एकादशी तिथी १२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२:२३ वाजता सुरू होईल आणि १३ रोजी पहाटे २:२६ वाजता संपेल. शास्त्रीय नियमानुसार, विजया एकादशी १३ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाईल. सूर्योदयाच्या वेळी एकादशी तिथी येते तेव्हा विजया एकादशीचे व्रत पाळले जाते हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून, १३ फेब्रुवारी रोजी विजया एकादशीचे व्रत पाळणे शास्त्रानुसार आहे. १४ फेब्रुवारी रोजी द्वादशी तिथी दुपारी ४:०० पर्यंत राहील. १४ तारखेला सकाळी ९:०० ते ९:३० दरम्यान विजया एकादशीचे व्रत सोडणे चांगले.

- विजया एकादशी व्रताचे महत्त्व : असे मानले जाते की भगवान रामाने देखील विजया एकादशीचे व्रत पाळले होते. लंकेला जाताना, भगवान रामाने त्यांच्या सैन्यासह समुद्रकिनाऱ्यावर विजया एकादशीचे व्रत केले होते. म्हणूनच या एकादशीला विजया एकादशी असे नाव देण्यात आले आहे.
- विजया एकादशी पूजा पद्धत : विजया एकादशीच्या दिवशी सकाळी ब्रह्म मुहूर्तावर उठून स्नान करा. यानंतर भगवान विष्णूचे ध्यान करा आणि त्यांची मूर्ती स्थापित करा. यानंतर, प्रथम भगवान विष्णूला चंदनाचा लेप लावा आणि कपडे अर्पण करा. आता, पिवळ्या रंगाच्या वस्तू, ज्यामध्ये पिवळी मिठाई, गूळ आणि हरभरा यांचा समावेश आहे, अर्पण करा. यानंतर, भगवान विष्णूचे ध्यान करा आणि त्यांचे मंत्र म्हणा. विजया एकादशी व्रत कथा म्हणा आणि नंतर आरती करा. शेवटी, सर्वांना प्रसाद वाटा.

# घरात या ठिकाणी कचराकुंडी नकोच, देवी लक्ष्मी आणि अन्नपूर्णा रागावतील...

**वास्तुशास्त्रात स्वच्छतेला खूप महत्त्व आहे. घरातील प्रत्येक वस्तू ठेवण्यासाठी योग्य दिशा आणि जागा सांगितली आहे. वास्तुशास्त्राच्या नियमांमध्ये थोडीशीही निष्काळजी तुमच्यासाठी समस्या निर्माण करू शकते. घरात ठेवलेल्या कचऱ्याच्या डब्यालाही वास्तुशास्त्रात महत्त्वाचे मानले जाते. घरातील घाण आणि कचरा साठवण्यासाठी कचराकुंडीचा वापर केला जातो. तो राहूशी संबंधित मानला जातो. म्हणून, घरात चुकीच्या ठिकाणी कचऱ्याचा डबा ठेवल्याने राहूचे प्रतिकूल परिणाम वाढू शकतात. यामुळे तुमच्या कुटुंबात काही समस्या निर्माण होऊ शकतात. याचा तुमच्या आर्थिक जीवनावर थेट परिणाम होऊ शकतो आणि आर्थिक समस्या उद्भवू शकतात. वास्तुशास्त्रात वर्णन केल्याप्रमाणे घरात कचऱ्याचा डबा ठेवण्याचे नियम आपण जाणून घेऊया...**

### स्वयंपाकघरात कचऱ्याचा डबा ठेवणे टाळा

वास्तुशास्त्रात, कचऱ्याचा डबा नकारात्मक ऊर्जा वाढवणारा मानला जातो. लोक अनेकदा त्यांच्या स्वयंपाकघरात कचऱ्याचा डबा ठेवण्याची चूक करतात. स्वयंपाकघर हे देवी अन्नपूर्णाचे निवासस्थान मानले जाते. म्हणून, स्वयंपाकघरात कचराकुंडी ठेवल्याने देवीला राग येऊ शकतो आणि आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात.

### देवघराच्या खोलीत कचराकुंडी ठेवू नका

देवघर हे घरातील सर्वात शुभ स्थान मानले जाते. ते असे स्थान आहे जिथे सर्वात जास्त सकारात्मक ऊर्जा वाहते. म्हणून, देवघराच्या खोलीत कचराकुंडी ठेवल्याने सकारात्मक उर्जेचा प्रवाह अडथळा येऊ शकतो. यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती बिघडू शकते आणि आर्थिक नुकसान देखील होऊ शकते.

### या दिशांना कचराकुंडी ठेवू नका

वास्तुशास्त्र घराच्या दिशांना देखील महत्त्व देते. घराच्या ईशान्य आणि वायव्य दिशेने कचराकुंडी ठेवणे टाळा. या दिशांमधून घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते. म्हणूनच, ईशान्य दिशेला कचराकुंडी ठेवल्याने तुमच्या कौटुंबिक जीवनावर खोलवर परिणाम होऊ शकतो. त्याचा नकारात्मक परिणाम पती-पत्नीमधील भांडणे आणि तणाव वाढवू शकतो.

### मुख्य प्रवेशद्वारावर कचराकुंडी ठेवू नका

घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर कधीही कचराकुंडी ठेवू नका. वास्तुशास्त्रात असे मानले जाते की देवी लक्ष्मी मुख्य प्रवेशद्वारातून घरात प्रवेश करते. येथे ठेवलेल्या कचराकुंडीमुळे नकारात्मक ऊर्जा वाढते. असे केल्याने आर्थिक अडचणी येऊ शकतात.

### घरात कचराकुंडी कुठे ठेवावी?

**घराची दक्षिण किंवा नैऋत्य दिशा ही कचराकुंडी ठेवण्यासाठी सर्वोत्तम जागा मानली जाते. वास्तुनुसार, घरातील नकारात्मक ऊर्जा या दिशांमधून बाहेर पडते. म्हणून, दक्षिण किंवा नैऋत्य दिशा ही कचराकुंडीसाठी सर्वोत्तम जागा मानली जाते. कचराकुंडीला झाकण असल्याची खात्री करा.**



# कॅन्टीनमध्ये बसून टाईमपास करण्याऐवजी सभागृहात बसा; पंतप्रधान मोदींनी खासदारांना फटकारलं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – चहा पिणाऱ्यासाठी कँटीनला बसता तसे चहावाल्यासाठी सभागृहात बसा, अशा शब्दात पीएम मोदींकडून खासदारांना उपदेश देण्यात आला. चहा पिण्यासाठी कॅन्टीनमध्ये बसण्यापेक्षा सभागृहात बसा, असा संदेश त्यांनी खासदारांना दिला. मोदी म्हणाले की, निशिकांत दुबे यांच्याकडून शिका, ते सभागृहात बसतात. असं म्हणत कॅन्टीनमध्ये बसणाऱ्या निशिकांत दुबे यांना देखील योग्य तो संदेश मोदी यांनी दिल्याची चर्चा आहे. लाखो करोडो लोक कार्यकर्ते असतात, त्यातून तुम्हाला संधी मिळते. त्या मिळालेल्या संधीचं सोनं करा कॅन्टीनमध्ये बसून टाईमपास करणाऱ्या खासदारांना मोदींनी फटकारले.



दुसरीकडे, अमेरिकन करार आणि माजी लष्करप्रमुख मनोज मुकुंद नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकावरून संसदीय अर्थसंकल्पीय अधिवेशन सातव्या दिवशीही गदारोळ झाला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना लोकसभेत बोलण्यापासून रोखण्यात आले तेव्हा विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ सुरूच ठेवला. लोकसभा सुरू होताच, खासदारांनी घोषणाबाजी केली. अवघ्या ६५ सेकंदातच कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. कामकाज दुपारी १२ वाजता सुरू झाले, परंतु पाच मिनिटांनीच दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. राज्यसभेतही राहुल गांधींच्या भाषणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभा अध्यक्ष खरगे यांना सांगितले की, चार दिवस झाले आहेत. राहुल गांधी नियमांचे पालन करत नाहीत, तुम्ही त्यांना ते का स्पष्ट करत नाही?

राज्यसभेतील सभागृह नेते जेपी नड्डा यांनी खरगे यांना सांगितले की, लोकसभेच्या कामकाजावर राज्यसभेत चर्चा करता येणार नाही. ते म्हणाले, काँग्रेस एका अबोध बालकाची बंधक करू नका. या गदारोळानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेतून सभात्याग केला. पंतप्रधान आज राज्यसभेत भाषण करू शकतात असे वृत्त आहे. लोकसभेत आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला, परंतु पंतप्रधान प्रतिसाद देऊ शकले नाहीत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव लोकसभेत मंजूर करण्यात आला. पंतप्रधानांच्या प्रतिसादाशिवाय अर्थसंकल्पीय अधिवेशन मंजूर करण्यात आले. गोंधळाच्या दरम्यान, लोकसभा पुन्हा एकदा दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली.

## भारतीय शेअर बाजार वधारला, बाजारात उत्साहाचे वातावरण

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुक्त व्यापार करारांच्या बाबतीत भारताची प्रगती उत्साहवर्धक आहे. युरोपियन युनियन सोबतच्या करारामुळे भारताला एकाचवेळी युरोपमधील २७ देशांची महाकाय बाजारपेठ खुली झाली आहे. भारताने एण व्यतिरिक्त निवडक देशांसोबत मुक्त व्यापार करार केले आहेत. या करारांमुळे भारत आता एकट्या अमेरिकेच्या बाजारपेठेवर अवलंबून नाही. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतःच भारतासोबत लवकरच मुक्त व्यापार करार करत असल्याचे जाहीर केले आहे. भारतावरी आयातशुल्क अर्थात टॅरिफमध्ये कपात करत असल्याचेही ट्रम्प यांनी जाहीर केले आहे. ट्रम्प यांच्या या घोषणांमुळे गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या वातारणाचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारावर दिसत आहे.

बुधवार ४ फेब्रुवारी २०६ रोजी सकाळच्या सत्रात शेअरची खरेदी झाली. प्रामुख्याने तेल व्यापाराशी संबंधित कंपन्या आणि भारतीय तेलशुद्धीकरण कंपन्यांच्या शेअरमध्ये तेजी दिसून आली. भारतात पायाभूत सुविधांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या आणि देशात कार्यरत संरक्षण क्षेत्रातील कंपन्या यांच्याही शेअरची खरेदी उत्साहाने होत आहे. यामुळे मुंबईचा शेअर बाजार अर्थात सेन्सेक्स आणि राष्ट्रीय शेअर बाजार अर्थात निफ्टी ५० यांच्यात मोठ्या प्रमाणात शेअरची खरेदी झाली. सेन्सेक्स आता ८३,८२४.४८ वर तर निफ्टी ५० आता २५,७८२.२० आहे. याआधी मंगळवारी ३ फेब्रुवारी रोजी सेन्सेक्स ८३,७३९.१३ वर तर निफ्टी ५० हा २५,७२७.५५ वर बंद झाला होता.

## पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाचा लातूर शहरातील मटका बुक्कीवर छापा

### १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल, १ लाख ४१ हजार रुपयांची रोकड जप्त

**लातूर (प्रतिनिधी)** – पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर शहरात चालणाऱ्या मटका बुक्कीवर कारवाई करण्यासाठी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे पथक लातूर शहरात पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक ०४.०२.२०२६ रोजी सायंकाळी लातूर शहरातील शाहू चौक ते गंजगोलाई रोडवरील गोजमगुंडे कॉम्लेक्समधील मटका बुक्कीवर कारवाई करत, बुकी चालवणाऱ्या विजय उद्धवराव लांडगे, रा. उमरगा बोरी, ता. जि. लातूर या इसमास ताब्यात घेवून त्याचेकडून नगदी १,४१,०००/- रुपयांसह ०३ मोबाईल, असा एकूण १,७५,१००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या कारवाईत, बुकी ऑफिसमध्ये मिळून आलेल्या रेकॉर्डनुसार व बुकीचालक विजय लांडगे याच्या कबुलीनुसार, गोविंद चंद्रसेन खाडप (पाटील) रा. उमरगा बोरी, ता. जि. लातूर हा सदर मटका बुकीचा मालक असल्याचे आढळून आले असून, त्याने शहरातील अनेक भागात आपले एजंट नेमल्याचे स्पष्ट झाले. सदर एजंटांच्या मदतीने तो आपला मटका व्यवसाय लातूर शहरात चालवत असल्याचे दिसून आले.

वरील प्रमाणे, मटका बुकीचालक विजय लांडगे, बुकी मालक गोविंद खाडप व त्याच्या १३ एजंटांविरुद्ध पोलीस ठाणे गांधी चौक येथे गुरनं क्र. ८२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोउपनि सोनकांबळे हे प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

सदर कारवाईत, पोलीस उपमहा निरीक्षक नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील सपोनि श्रीराम माचेवाड यांचेसह पोहेकॉ. प्रदिप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. नागरिकांना अवैध व्यवसायांची माहिती देणे सुकर व्हावे यासाठी, परीक्षेत्रीय पातळीवर 'खबर' ही हेल्पलाइन सुरू करण्यात आली असून, आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहा निरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१ ५० १०० १०० या 'खबर' हेल्पलाइनवर कळवून, अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहा निरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## 'पल्स' परिषदेच्या माध्यमातून वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचा 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करा – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)** – वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या 'पल्स' या वैद्यकीय परिषदेचे आयोजन मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर, येथे २७ व २८ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत.

'पल्स' वैद्यकीय परिषदेचे भव्य दिव्य आयोजन करून परिषदेच्या माध्यमातून 'वेलनेस' उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. पारंपरिक खर्चिक असलेल्या वैद्यकीय उपचाराऐवजी 'वेलनेस' उपचारांकडे नागरिकांचा ओढा वाढत आहे. 'वेलनेस' उपचार पद्धतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्यामुळे आयुषमधील उपचार पद्धतींना 'वेलनेस' कडे वळविण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक स्टार्टअप कार्यरत आहेत. अधिकाधिक स्टार्टअपला परिषदेत सहभागी करून घ्यावे. जेणेकरून परिषदेमध्ये या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन संशोधनावर आधारित चर्चांमधून कर्करोगासारख्या आजारांवर सहज, सोपी आणि परवडणारी उपचार पद्धती विकसित करण्यात स्टार्टअपला मदत होईल.वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील याबाबत दक्षता घ्यावी, त्यांच्या माध्यमातून राज्यात होत असलेल्या 'बल्क ड्रग पार्क' मध्ये गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावेत. सबंधित विभागांनी समन्वयाने काम करीत परिषदेच्या आयोजनातून राज्याला वैद्यकीय क्षेत्रात मोठा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

# तब्बल ३२ तासानंतर मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक पूर्ववत

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक तब्बल ३२ तासांनंतर पूर्ववत झाली आहे. मुंबई आणि पुणे या दोन मोठ्या शहरांमधल्या वाहतुकीचा वेग वाढावा म्हणून नव्वदच्या दशकात मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे बांधण्यात आला होता. या एक्स्प्रेस वेच्या वेगाला एका अपघातानं ब्रेक लागला होता. अखेर ३२ तासांनंतर मध्यरात्री २ वाजता पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतूक पूर्ववत झाली.



आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील, प्रोपलीन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटला आणि मुंबईच्या दिशेनं येणारी वाहतूक तात्काळ ठप्प झाली होती. दुर्घटनाग्रस्त टँकरमधील गॅस सुरक्षितपणे दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यात आला आणि अपघातग्रस्त टँकर क्रेनच्या सहाय्यानं बाजूला करण्यात आला. अपघातग्रस्त टँकर रस्त्याच्या बाजूला करुन मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरची वाहतूक सुरळीत करण्यात आली.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील गॅसचा टँकर ३२ तासांनी हटवण्यात आला. त्यानंतर मुंबईकडे जाणारा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. पण मळवलीजवळ एक ट्रक बंद पडला आहे. तसेच अनेक अवजड वाहनांचे चालक झोपी गेल्याने कामशेत जवळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आता महामार्ग पोलीस झोपी गेलेल्या वाहन चालकांना उठवून गाड्या पुढं काढण्याचे प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आडोशी बोगड्याजवळ वाहतूक सुरळीत असली तरी प्रवाशांना काहीवेळ ताटकळत बसावे लागले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूककोंडीची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. भविष्यात अशी घटना घडू नये आणि घडल्यास आणखी कोणत्या प्रकारची सज्जता असावी, याबाबत चौकशी करुन शिफारसींसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएसआरडीसीला दिले आहेत.

## नाशिकच्या ६२२ ग्राम पंचायतींमध्ये 'प्रशासक राज'

**नाशिक (प्रतिनिधी)** – यंदा मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील ६२२ ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यात येणार आहे. सार्वत्रिक निवडणूका होऊन नवी कार्यकारिणी अस्तित्वात येईपर्यंत प्रशासकांच्या हाती गावाच्या चाव्या असतील. त्यामुळे विकासकामांवर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांहून अधिक असल्याने जिल्हा परिषद आणि पंधराही पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्याची अर्थवाहिनी असलेल्या जिल्हा परिषदेचा कारभार सध्या प्रशासकाच्या हाती आहे. त्यातच आता जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपुष्टात येणार असल्याने तेथेही प्रशासक नेमण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

जिल्ह्यात पेठ व सुरगाणा हे दोन तालुकेवगळता उर्वरित सर्व तालुक्यांमधील ६२२ ग्रामपंचायतींची मुदत यंदा संपुष्टात येत आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयाचा आदेश आणि राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शनानुसार संबंधित ग्रामपंचायतींवर आता प्रशासक नेमण्याची तयारी सुरुरू झाली आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी प्रशासक नियुक्तीसंदर्भात जिल्हा प्रशासनाला सूचना केल्या आहेत.

राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शनानुसार संबंधित गावांमध्ये सार्वत्रिक निवडणुका पार पडून नवी कार्यकारिणी नियुक्तीपर्यंत प्रशासकराज असणार आहे. एकूण परिस्थिती लक्षात घेता लवकर संबंधित गावांमध्ये निवडणुका लागण्याची शक्यता कमीच दिसून येत आहे. त्यामुळे गावांच्या विकासावर परिणाम होणार आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री ए.जी. चव्हाण)
किरकोळ दिवाणी अर्ज क. ९९/२०२६
व इतर वि. निल
अर्जदार – शांताबाई भ्र. बालाजी कांबळे
वय ५८ वर्ष धंदा घरकाम
रा. गणेशनगर रोड-क्रांतीनगर, नांदेड ता.जि नांदेड.
**विरुद्ध**
**निरंक**
**प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज**

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार शांताबाई कांबळे याचे वारस आहेत मयत बालाजी सटवाजी यांचा दिनाक २५/१०/२०२२ रोजी मृत्यू झाला. अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ आहेत. वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यानी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २३/२/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल. आज दिनांक ३.२.२०२६ रोजी सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| **कनिष्ठ लिपिक<br>७वे सह दिवाणी न्यायालय<br>क स्तर, नांदेड** | **आदेशावरून/-<br>सहा. अधिक्षक<br>दिवाणी न्यायालय क.स्तर नांदेड** |

## Change In Name

My Old Name is FAROZ ALI KNAH which now I am changing as New Name PATHAN FEROZ ALI KHAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address -
H.No. 3-2-161, Gavali Pura, Railway Station Road, Nanded 431601
Mo.No. 9766108327

## उमरी नगर परिषद उमरी ता. उमरी जि. नांदेड

ई-निविदा सुचना क्रमांक (०७) सन २०२५-२६

जा.क्र.उनप/२०२६/१९५ दिनांक ०५/०२/२०२६

### नगरपरिषद निधी

उमरी नगर परिषद उमरी जिल्हा नांदेड करीता मुख्याधिकारी नगर परिषद उमरी यांचे कडुन स्वच्छता विभाग अंतर्गत ०१ कामकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुण्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीव्दारे मागवित आहेत.

टिप:- सदर निविदे मध्ये ०१ काम समाविष्ट असुन कामाचो संपुर्ण माहीती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

**स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद उमरो जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३१/२०२६
रेणुका भ्र. मारोती मोरे व इतर वि. निरंक

अर्जदार:-
१. रेणुका भ्र. मारोती मोरे,
वय ४१ वर्षे, धंदा घरकाम,
२. श्रीरंग पि. मारोती मोरे,
वय २५ वर्षे, धंदा मजुरी,
अर्जदार क्र. १ व २ रा. चिंचाळा, पोस्ट सोनारी, ता. भोकर, जि. नांदेड.
३. भक्ती पि. हौसाजी गायकवाड,
वय २० वर्षे, धंदा घरकाम,
रा. बेलदरा, ता. उमरी, जि. नांदेड.

**विरूध्द**

गैरअर्जदार :- निरंक.

दावा:- कलम ३ मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ कायदयाप्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील मयत नामे **मारोती चंपती मोरे**, यांचा मृत्यू दिनांक १६.११.२०२१ रोजी मौजे शिंगारवाडी, ता. भोकर, जि. नांदेड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूपत्राआधारे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. जी. डी. वारकड, यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप/उजर असल्यास त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे /आक्षेप नोंदवावे, अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

.आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

| | |
|---|---|
| वरिष्ठ लिपीक<br>दिवाणी न्यायालय व.स्तर<br>भोकर. | अधिक्षक<br>दिवाणी न्यायालय व.स्तर,<br>भोकर. |

## जाहिर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३२/ २०२६** पुढील तारीख – ११.०३.२०२६

अर्जदार : ०१. रेहानाबाई चांद सय्यद, वय –५२ वर्षे, व्यवसाय –घरकाम,
रा. नाईकवाडी गल्ली, बिलोली. ता. बिलोली जि. नांदेड.
०२.अनिसाबी अहेमद शेक, वय –५४ वर्षे, व्यवसाय –घरकाम,
रा. नाईकवाडी गल्ली, बिलोली. ता. बिलोली जि. नांदेड.
०३. बानुबी सय्यद अहेमद, वय – ४९ वर्षे, व्यवसाय – निरंक,
रा. नाईकवाडी गल्ली, बिलोली. ता. बिलोली जि. नांदेड.
०४. सलीम अहेमद सय्यद; वय – ५० वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. नाईकवाडी गल्ली, बिलोली. ता. बिलोली जि. नांदेड.

**विरुध्द**

गैरअर्जदार: निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत अहेमद मीर सय्यद** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ ह्या **मयत अहेमद मीर सय्यद** यांच्या मुली आहेत व अर्जदार क्रमांक ०४ हा मुलगा आहे. **मयत अहेमद मीर सय्यद** यांचा मृत्यू दिनांक ०७.०५.२०२३ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांना **मयत अहेमद मीर सय्यद** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०१/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| क. लिपीक<br>दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली | आदेशावरून,<br>03/2/2026<br>सहा. अधिक्षक<br>दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली |

## Change In Name

My Old Name **MUSTAK PATHAN** which now I am changing as New Name **MUSTAK PATHAN NANHU MIYA PATHAN.**

Hence forth my all correspondence will be done as per my New Name. please consider the same.

**Sign by**
**MUSTAK PATHAN NANHU MIYA PATHAN**
H.NO.2-5-982, TAHURABAG,
KHADAKPURA, NANDED -431601
Mob. No. 9730322276

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## Change In Address

I SHAIKH MUNTAZIR Decleared that, My Old Address is H.No.9-5-1766, Near Masjide Hamza, Millar Nagar, Degloor Naka, Nanded 431604 (M.S.). I am Chaniging as new Address. H.No. 9-5-1762, Millat Nagar, Near Hamza Masjid, Nanded Maharashtra Nanded 431604.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाचा अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर छापा

## २ कोटी रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –** परिक्षेत्रातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने धडक कारवाईही सुरुवात केली आहे. नांदेड जिल्ह्यातील मार्कंड शिवारातील मार्कंडेश्वर महादेव मंदिराजवळ चालू असलेल्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर या पथकाने कारवाई करून जवळपास दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी रात्री १२:३० वाजे दरम्यान माळाकोळी ते खेडकरवाडी रोडवर भारत बेज कंपनीचा एक हायवा अवैधरित्या वाळू वाहतूक करताना पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकास मिळून आला होता. सदर हायवामधून सुमारे पाच ब्रास रेती वाहतूक होत असल्याचे आढळून आले होते. वाळूसह मिळून आलेला हायवा असा २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलीस ठाणे माळाकोळी येथे जमा करण्यात आला होता. या प्रकरणी पोलीस ठाणे माळाकोळी येथे गु. र. नं. १६/२६ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिताप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर वाळू वाहतूक ही नांदेड ग्रामीण हद्दीतील गोदापात्रातून होत असल्याचे आढळून आल्याने विशेष पथकाने रात्री २ वाजता दरम्यान पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीतील मौजे मार्कंड शिवारातील मार्कंडेश्वर महादेव मंदिराजवळील धक्क्यावर कारवाई करत टाटा सिग्मा कंपनीचे चार हायवा, एक जेसीबी मशीन, नदीतून रेती उपसण्याचे एक इंजिन, वाळूने भरलेले (६७) तराफे, दोन मशीन यासह नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (६०) ब्रास वाळू, असा एकूण १ कोटी ८२ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे नदिड ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



गोदावरी नदीपात्रातून इंजिनच्या मदतीने वाळू उपसण्याचे सदर कामकाज रात्रीचे अंधारात सुरू होते. मध्यरात्री २ वाजता विशेष पथक सदर ठिकाणी दाखल होताच, इंजिन, तराफे, मशिनरी व हायवावरील लोकांनी आपले काम सोडून तेथून पळ काढला. सदर ठिकाणावरून जप्त केलेल्या उपरोक्त साधन सामुग्रीवरून या घाटावरून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा व साठवणूक होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही कारवायांत पथकाने पाच हायवा किमती १ कोटी ६० लाख, एक जेसीबी मशीन किंमती २५ लाख, एक रेती काढण्याचे इंजिन किंमती एक लाख, (६७) वाळूने भरलेले तराफे किंमती १३ लाख ४० हजार, (६५) ब्रास वाळू किंमती २ लाख ६५ हजार, नदीपात्रातून वाळू काढण्यासाठी वापरण्यात येणारी दोन मशीन किंमती ५० हजार असा असा एकूण २ कोटी २ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत सपोनि श्रीराम माचेवाड यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, अंमलदार गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना १० हजार रुपयांचे बक्षीस व प्रशंसापत्र देवून त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी) –**पाणी फाउंडेशन फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत २ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र (के.व्ही.के.), सगरोळी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्गदर्शन करताना शेतकरी हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

बदलत्या काळात शेतीमध्ये ज्ञानाधिष्ठित, तंत्रस्नेही व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उत्पादनवाढ, खर्च नियंत्रण व उत्पन्नवाढीचे नवे मार्ग शोधावेत, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले. हा कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी, मार्गदर्शक व परिवर्तनकारी ठरला. प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना दिलेली सदिच्छा भेट शेतकऱ्यांसाठी विशेष प्रेरणास्त्रोत ठरली.



या निवासी प्रशिक्षणासाठी नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील विविध गावांतून शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तीन दिवस चाललेल्या प्रशिक्षणात आधुनिक शेती तंत्रज्ञान, शाश्वत शेती पद्धती, गटशेती, मूल्यवर्धन, शेतीपूरक उद्योग, बाजारपेठ व्यवस्थापन तसेच शेतीतील नव्या संधी याबाबत सखोल व प्रात्यक्षिकाधारित मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षण काळात शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि बदलाची सकारात्मक जाणीव स्पष्टपणे दिसून आली. या कार्यक्रमास उपसंचालक आत्मा श्रीमती अर्चना गुंजकर, कृषी विज्ञान केंद्राचे चेअरमन प्रमोद देशमुख, पाणी फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य समन्वयक सत्यवान देशमुख, नांदेड विभागीय समन्वयक प्रवीण काथवटे, संदीप चव्हाण, उमेद तालुका व्यवस्थापक कंधार तसेच अश्वमेध ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, कंधार येथील विविध विभागांचे अधिकारी, तज्ज्ञ मार्गदर्शक व मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची स्पष्ट दिशा, नव्या संधींची ओळख आणि शाश्वत शेतीचा मार्ग मिळाल्याचा अभिप्राय व्यक्त करण्यात आला. प्रशिक्षणार्थींनी तीन दिवसांच्या अनुभवांबाबत समाधान व्यक्त करत भविष्यात आपल्या शेतीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला. एकूणच फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत आयोजित हा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरला असून, शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम घडवणारे पाऊल ठरले आहे.

# सायाळ येथे उघड्या रोहित्रामुळे वीजेचा धक्का लागून बैलाचा मृत्यू

## शेतकऱ्यांचे ८० हजार रुपयांचे नुकसान



**लोहा (प्रतिनिधी) –** लोहा तालुक्यातील मौजे सायाळ येथे उघड्या रोहित्रामुळे वीजेचा धक्का लागून बैलाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे एका शेतकऱ्याचे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. ही घटना दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता घडली.

याबाबत सायाळ येथील शेतकरी श्याम संभाजी पवार यांनी लोहा तहसीलदार व म.रा.वि. महावितरणचे लोहा येथील उपकार्यकारी अभियंता यांना निवेदनाद्वारे कळविले आहे की, दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सायाळ येथे म.रा. वि. महावितरणच्या उघड्या रोहित्रामुळे वीजेचा जोरदार धक्का लागून बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांचे ८० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी लोहा तहसीलदार व महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करुन पंचनामा करावा. तसेच शासन व महावितरणच्या वतीने तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी श्याम संभाजी पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

> सायाळ येथील शेतकरी श्याम संभाजी पवार यांच्या बैलाला महावितरणच्या निष्काळजीपणामुळे व रोहित्र उघडे ठेवल्यामुळे वीजेचा धक्का लागून त्यांच्या बैलाचा मृत्यू झाला आहे. जर महावितरणने रोहित्र उघडे ठेवले नसते रोहित्राला झाकण लावले असते तर मुक्या जनावरांना विजेचा धक्का बसून त्या मुक्या जनावरांचा मृत्यू झाला नसता. तेव्हा शासनाने व महावितरणने या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करावी किंवा त्यांना दुसरा बैल घेऊन द्यावा, अशी मागणी सायाळचे माजी सरपंच साहेबराव पाटील पवार, बाळू पाटील पवार यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच सायाळ येथील महावितरणच्या उघड्या रोहित्राला झाकण लावून ठेवावे, भविष्यात अशा घटना घडू नये अशी मागणी केली आहे.

# ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसमध्ये रंगणार आजपासून नारी क्रीडाशक्तीचा जल्लोष!

**नांदेड(प्रतिनिधी) –** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन महाराष्ट्रातील इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन (आयईडीएसएसए) यांच्या वतीने करण्यात येते. डिप्लोमा विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, नेतृत्वगुण आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश आहे.

या स्पर्धा राज्यातील विविध विभागांमध्ये आयोजित केल्या जातात आणि यातून पुढे खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र होत असतात. यावर्षीच्या जी२ पॉलीटेक्निक मुलींच्या झोनल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याची मानाची जबाबदारी ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णूपुरी, नांदेड या संस्थेला देण्यात आली आहे. ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसने खेळामध्ये राज्यात अव्वल कामगिरी करत मागील ८ वर्षापासून सातत्याने सामान्य विजेतेपद मिळवले असल्यामुळेच सदरील खेळ आयोजनाची जबाबदारी दिली आहे. या स्पर्धा दिनांक ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान पार पडणार असून, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बुद्धिबळ (चेस), कॅरम आणि



अथेलेटिक्स या खेळांचा समावेश आहे. शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी उद्घाटन समारंभाने स्पर्धांचा दिमाखदार शुभारंभ होणार आहे.

या स्पर्धांमध्ये नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातील पॉलीटेक्निक व डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडाप्रमुख सुशांत देशमुख, शेख सलीम, प्रा. महेश लांडगे, प्रा. पंकज शिंदे, प्रा. अभिजीत पवळे, महेश शिरसे, कुणाल चुकेवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत असल्याची माहिती संकुल संचालक डॉ. विजय पवार यांनी दिली.

## नांदा सौख्यभरे

### कंठेवार-अडबलवार

नांदेड-येथील रहिवासी बालाजी कंठेवाड व सौ. शर्मिला कंठेवाड यांची कन्या चि. सौ. कां. रिद्धी यांचा शुभविवाह हणमंतराव अडबलवार आणि सौ. दैवशाला अडबलवार यांचे चिरंजीव योगेश यांजसमवेत आज शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ए. के. संभाजी मंगल कार्यालय यशोविहार, नांदेड येथे संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

-संपादक

# पत्नीचा खून करणाऱ्या पतीला जन्मठेपेची शिक्षा; जिल्हा न्यायालयाचा निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)–** चारित्र्याच्या संशयावरून पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने मारून तिचा निर्घृण खून करणाऱ्या पतीला येथील जिल्हा न्यायाधीश तावशीकर यांनी गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी रोजी जन्मठेपेची व पाच हजार रुपये रोख दंडाची शिक्षा सुनावली. किनवट तालुक्यातील पार्डी (खु) जिल्हा नांदेड येथे १७ मार्च २०२२ रोजी सकाळी सुमारे ८ वाजता ही धक्कादायक घटना घडली होती.

श्यामसुंदर भाऊराव घमेवाड (वय ३२) याने पत्नी चंद्रकला हिच्यावर चारित्र्याचा संशय घेत हातातील कुऱ्हाडीने डोके, मान व हातांवर अनेक घाव घातले. गंभीर जखमी अवस्थेत चंद्रकला हिचा मृत्यू झाला होता. ही घटना त्यांच्या दोन अल्पवयीन मुलीसमोर घडली होती.

या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात शंकर हणमंता राजूलवाड (वय ६२) यांच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक मिथुन सावंत यांनी करून आरोपी श्यामसुंदर घमेवाड यास अटक केली. सखोल तपासानंतर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयात खटला क्रमांक ११७/२०२२ अन्वये सुनावणी झाली. सरकार पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले.

घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या मुलींनी न्यायालयात आपले जबाब बदलले असले, तरी अतिरिक्त सरकारी वकील ॲड. महमद अब्बास मोहम्मद हैदर यांनी परिस्थितीजन्य ठोस पुरावे मांडले. घटनेनंतर घटनास्थळी आलेल्या साक्षीदारांसमोर आरोपीच्या हातात कुऱ्हाड असल्याचे, तसेच बायोलॉजिकल तपासणीत आरोपीच्या कपड्यांवर व कुऱ्हाडीवर महिलेचे रक्त आढळल्याचे सिद्ध करण्यात आले. मयत महिला चंद्रकलाच आहे हे तपासात निष्पन्न झाले होते.

आरोपीकडून कोणताही ठोस बचाव सादर करण्यात आला नाही. घटनेच्या वेळी तो घटनास्थळी उपस्थित नव्हता, सिद्ध करणारा पुरावा देखील सादर होऊ शकला नाही. अखेर या प्रकरणात श्यामसुंदर भाऊराव घमेवा याला जन्मठेप आणि पाच हजार रुपये रोख दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

# नांदेडमध्ये विद्यार्थ्याला मारहाण करून व्हिडिओद्वारे खंडणीची मागणी; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी) –** शिक्षणासाठी नांदेडमध्ये राहणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थ्याला बेदम मारहाण करून, त्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मूळचा कंधार तालुक्यातील कलंबर येथील रहिवासी असलेला एक विद्यार्थी सध्या नांदेडच्या आनंदनगर भागात राहून आपले शिक्षण पूर्ण करत आहे. २६ जानेवारी रोजी रात्री ११:३० च्या सुमारास तो विद्युतनगर भागातील 'कंधार खिचडी' हॉटेलसमोर आला असता, दबा धरून बसलेल्या चौघांनी त्याला गाठले. संशयित आरोपींनी संगणमत करून विद्यार्थ्याला बेदम मारहाण केली. केवळ मारहाण करून न थांबता, त्यांनी या कृत्याचा व्हीडीओ चित्रीत केला. हा व्हीडीओ सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देत त्यांनी विद्यार्थ्याकडून ३ हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर पुन्हा २० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी करत त्याला जिवे मारण्याची धमकी दिली.

पीडित मुलाने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी खालील व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. ज्यात अतिष जाधव, प्रसाद मनूरकर, कृष्णा ऊर्फ गोटू दंतपल्लीवार आणि एक अल्पवयीन साथीदार यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या त्रासाला कंटाळून पीडित विद्यार्थ्याने ४ फेब्रुवारी रोजी पोलिसांत धाव घेतली. विमानतळ पोलिसांनी याप्रकरणी खंडणीचा गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक हुसेन या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# मनुष्य जीवनात सेवापूर्ती कधीच संपत नसते -डॉ. सुधीर देशमुख



**नांदेड (प्रतिनिधी)–** मनुष्य जीवनात सेवा ही कधीच संपत नसते. आपल्या हातून सत्कर्म घडावे हीच आपल्या जीवनाची यशस्वी सेवापुर्ती असल्याचे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी केले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यालयातून चतुर्थी श्रेणी कर्मचारी श्याम जोंधळे, रमेश सातोरे, विजय पंडित, भोकरे शकुंतला, सुरेखा कांबळे वयानुरूपाने हे आज या कार्यालयातील सेवानिवृत्त होत आहेत.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे कर्मचारी सेवापूर्ती सोहळा बाह्यरुग्णालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांची उपस्थिती होती.

भारत वानखेडे प्रणित अनु. जाती /जमाती/इ. जा./भज/मंत्रालयीन अधिकारी कर्मचारी संघटना मंत्रालय मुंबई आयोजित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम नुकताच आयोजित केला होता. या कार्यक्रमास डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता अध्यक्ष म्हणून होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे महासचिव डॉ. उत्तम सोनकांबळे, अधीक्षक डॉ. विजय कापसे, डॉ. वाकोडे, सांस्कृतिक शाखेचे प्रदेशाध्यक्षा प्रमोद गजभारे, सौ. मुदिराज, इंजि. गायसमुद्र, ॲड. चंद्रप्रकाश सांगवीकर, सामाजिक कार्यकर्ते संजय टिके होते.

# गुंगीचे इंजेक्शन देऊन गोवंश चोरणारी आंतरराज्य टोळी एलसीबीच्या जाळ्यात; साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणांहून रस्त्यावरील किंवा शेताच्या आखाड्यावरून गोवंश चोरी करून अवैध कत्तलीसाठी तस्करी करणारी आंतरराज्य चोरट्यांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली. चोरट्यांनी त्यांच्याकडून साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्ह्यात होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालावा आणि गुन्हेगारांची जागा त्यांना दाखवून द्यावी, असे वरिष्ठ स्तरावरून आदेश मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यावरून दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सोनकांबळे व अंमलदार यांच्यासह हद्दीत रवाना झाले. जिल्ह्यातील कुंडलवाडी, उमरी, नायगाव व रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांत रात्रीच्या वेळी शेतातील व रोडवरील गोवंशाना वाहनात चोरुन बाजारात विकणाऱ्या आरोपीतांबाबत माहिती मिळाली. त्यावरुन प्राप्त माहितीनुसार दूध डेअरी चौकातील ब्रिजखाली गेल्यानंतर मो. सिराज, वय ३५, रा. पाकीजानगर, नांदेड, शेख अशरफ शकील वय ३९, व्यवसाय चालक रा. मनोर ता. जि. पालघर ह. मु. लेबर कॉलनी, नांदेड., कय्युम अय्युबखान, वय २८ वर्ष, रा. मुंब्रा, रशीद कंम्पाऊंड ता. जि.ठाणे ह.म. लेबर कॉलनी, नांदेड, सय्यद सोहेल ऊर्फ सोहेल पटेल



सय्यद फारुख रा. लेबर कॉलनी, नांदेड, मोहम्मद तय्यब कुरेशी रा.भैंसा राज्य तेलंगाणा, अज्जू (पूर्ण नाव माहिती नाही), सलीम (पूर्ण नाव माहिती नाही) रा. कल्याण, कलाम (पूर्ण नाव माहिती नाही) रा. आलुप्याज मार्केट, नांदेड, फैजान कुरेशी रा. देगलूर नाका, नांदेड, सय्यद शारेक ऊर्फ राजू रा. बिलाल नगर, नांदेड या आरोपीतांपैकी एक ते तीन आरोपी ताब्यात घेतले. त्यांना गोवंश चोरी बाबत विचारपुस केली असता त्यांनी नांदेड जिल्हयात विविध ठिकाणावरुन यातील इतर आरोपी चार ते दहा यांच्या सोबत गोवंश चोरी करुन आरोपी क्रमांक चार याने गोवंश वेगवेगळया बाजारात विक्री केले बाबत सांगितले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com